सं. वाचनालय, ठाणे.
ना-ना
३००७
BVBK-0403007

[illegible] पुस्तकालय, [illegible]
जिला [illegible]

३००८
१०।८।९४

# रानमेवा

RANMEWA

बाबुराव शाळीग्राम

BABURAO SHALIGRAM

म. सं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. ३००८ दिनांक १०५।८।८
विषय बा. वा. क्र. ..........

BVBK-0403007

सोनाली प्रकाशन, पुणे

• प्रकाशक •
श्री. द. ग. आरवडे
सोनाली प्रकाशन
८६, नारायण पेठ, पुणे ३०.

• सर्व हक्क •
लेखकाधीन

• सजावट •
श्री. संदीप सोनवणे

• प्रथमावृत्ती •
नोव्हेंबर, १९९३

• अक्षरजुळणी •
श्री समर्थ साई मुद्रण
४२६, सोमवार पेठ,
बरके आळी, पुणे ४११ ००१.

• मूल्य •
रुपये अठरा फक्त

# अनुक्रम

Anukram.


| | | |
|---|---|---|
| १. हसत जगावे हसत मरावे | ◆ | ५ |
| २. शोधातून बोध | ◆ | ९ |
| ३. अर्धज्ञान नाशाचा प्राण | ◆ | १३ |
| ४. निर्धन लक्षाधीश | ◆ | १७ |
| ५. जिद्दी मुलगा | ◆ | २२ |
| ६. बाबुराव मूर्ख कसा ? | ◆ | २५ |
| ७. यशाची गुरुकिल्ली | ◆ | २९ |
| ८. चतुराई | ◆ | ३२ |
| ९. रोखीचा व्यवहार | ◆ | ३५ |
| १०. कारण अभ्यास तुका म्हणे... | ◆ | ३८ |
| ११. ग्रामराज्यातील खरा राजा | ◆ | ४२ |
| १२. मूकप्रेम | ◆ | ४६ |
| १३. लंकेत सोन्याच्या विटा | ◆ | ५० |
| १४. लक्ष्मीची पूजा | ◆ | ५३ |

3006

# १.


# हसत जगावे हसत मरावे

आमच्या गावात येसबाबा नावाचा एक म्हातारा राहत होता. म्हातारा असूनसुद्धा तो एखाद्या तरुणाला लाजवील इतक्या उत्साहाने शेतात राबायचा. उन्हाळ्यात आपली गुरंढोरं गावच्या रोटावर चारायचा. गुराख्याच्या मुलांच्यामध्ये येसबाबा फार रमायचा. येसबाबा आला नाही तर गुराखी पोरांचा दिवस कंटाळवाणा जायचा.

येसबाबा, नव्वदीला आलेला म्हातारा नेहमी जुनी निरुत्तर करणारी कोडी सांगायचा. त्याचे प्रश्नसुद्धा साधे नसायचे. त्याचे उदाहरणच द्यायचे झाले तर, 'पाच रुपयाला पंचे चाळीस नग तर एक रुपयाला किती ?'

याचे उत्तर मुले चटकन देत. 'नऊ.' पण हे उत्तर चुकीचे कसे ते तो सांगायचा. 'पाच रुपयाला पंचे चाळीस म्हणजे एक रुपयाला आठ पंचे येतील. कुठल्या शाळेत जाता ? तुम्हाला साधे गणित येत नाही.' मुलांना मात्र त्यांच्या बुद्धीचातुर्याचे कौतुक वाटायचे व मुले आणखीनच गलका करून त्याला अशीच कोडी सांगायला लावायचे. 'पाच मिनीटात एक शर्ट वाळतो. तर पाच शर्ट ओळीने वाळत घातले तर किती मिनिटात वाळतील ?' काही धूर्त मुले त्याचं बरोबर उत्तर देत. पण बहुतेक पंचवीस मिनिटे सांगत. पण तो सर्वांनाच चूक म्हणायचा. मुलांनी ओरडा-आरडा केला की, कसं काय कसं काय म्हटलं की येसबाबा सांगायचा, 'पाच मिनिटे एक सेकंद.' हे त्याचे उत्तरसुद्धा बुद्धिचातुर्याचे असायचे. 'पाच मिनिटे सांगायला दोन सेकंद वाढतात ते धरून उत्तर आहे.' या उत्तराने मुलांमध्ये गलका व्हायचा. येणारी-जाणारी माणसे मुलांना म्हणायची, 'ये त्या येसबाबाला काय त्रास देताय. जा बघू दूर.' तेव्हढ्यापुरती मुलं दूर जात व परत करमत नसल्याने येसबाबा जवळ येत.

त्या तरुण माणसांना येसबाबा म्हणायचा, "तुमचा उद्योग पर



मपल्याला तरास.'' या त्याच्या बोलण्यानं ती तरुण माणसं काय समजायचे ते समजायची व हसत हसत जायची.

येसबाबा झोपलेला सुद्धा मुलांना खपत नसे. येसबाबा झोपला की मुले त्याच्या कानावर, नाकावर दोऱ्याने वळवळ करीत. या त्यांच्या गंमतीने येसबाबा जागा व्हायचा, पण तो परत झोपल्याचे ढोंग करायचा व पुन्हा मुलांनी दोरा वळवळला की आपल्या स्वत:च्याच तोंडात मारून घ्यायचा. याची मुलांना गंमत वाटायची व ती दबलेल्या आवाजात हसायची, खिदळायची, झाडाआड लपायची....

गावात सणवाराला येसबाबाला सुट्टी असायची. सुताराच्या नेटावर अगर खुंटावरच्या आड्यावर चार माणसांच्या घोळक्यात तर कधी चिमबाईच्या ओट्यावर तरण्या पोरींची तो फिरकी घ्यायचा. म्हणायचा, ''ये गंगे, तुझ्या नवऱ्याचं नाव घे... अगं, तुझा नवरा ममईला गेला

तिकडंच त्यानं दुसरं लगीन केलंय. तो आता गावाकडं यायचाच नाही बघ!'' गंगी वैतागायची. तिच्या मैत्रिणीत हसण्या खिदळण्याची लकेर उमटायची व त्यांच्या त्या आनंदात सर्वजण सहभागी व्हायचे.

एक दिवस चिमबाई म्हणाली, ''येसबाबा तू सगळ्या गावाला हसवतोस. तू दिसला नाहीस तर आम्हाला करमत नाही.'' यावर येसबाबा म्हणायचा, ''चिमबाई, मी जिवंतपणी लोकांना हसवतोय. पण मेल्यावरसुद्धा तुम्हाला हसवीन.''

या वाक्यानेसुद्धा सर्व बसलेल्या मंडळींना हसू यायचे. पण हे येसबाबांचे शद्ब लवकरच खरे होणार होते.

एक दिवस गावात येसबाबा फार आजारी असल्याची बातमी फुटली. बरेच दिवस येसबाबा त्याच्या बसण्याचे ठिय्यावर आला नव्हता. लोकांना सुनं सुनं वाटत होतं. येसबाबा नाहिसा झाल्याची दुसरी बातमी त्यांच्या घरच्या मंडळींकडून गावात पसरली.

येसबाबा कुठं नाहिसा झाला? येसबाबा कुठं नाहिसा झाला? ज्याच्या त्याच्या तोंडी ह्याविषयाची गावात चर्चा सुरू झाली.

नव्वदीच्या घरातला हा येसबाबा म्हातारा तर होताच. पण इतका अशक्त होता की हाडं आणि त्याला लपेटलेली कातडी याशिवाय मांस असं त्यांच्या अंगावर नव्हतंच. असा माणूस कुठं जाणार? कुठे तरी मरून पडला असेल, असं आता लोकांना वाटू लागलं. कारण आता तो नाहिसा झाल्याला एक आठवडा उलटून गेला होता.

येसबाबाचे बालसवंगडी हिरमुसल्या तोंडानं वावरत होते. त्यांना इतरांपेक्षा जास्त दु:ख झाले होते. त्यांचे हास्य मावळले होते. गावातील मोठी माणसं मुलांनाच दटावीत होती. 'ये पोरांनो, कुठे येसबाबा? शोधा त्याला गावभर-आणा सापडून. तुम्हीच त्याला पळवून लावला.' सारे सवंगडी, त्याच्या बैठकीतले लोक चिन्ताग्रस्त होते. एव्हढ्यात त्यांच्या घरातली एधाबाई ओरडत सांगू लागली, ''अहो चिमबाई, बघा हो. अहो, आमचा येसबाबा आमच्या माजघराच्या अंधाऱ्या खोलीत कोपऱ्यात बसलाय. मला तर बाई आत जायला भ्यावं वाटतं. चला वो सासूबाई, बघा तर खरं काय झालंय. मला तर वेगळंच वाटतंय.'' चिमबाई घाबऱ्या घाबऱ्या माजघरात गेली. येसबाबा माजघराच्या कोपऱ्यात मरून पडला

होता. व वाळून लाकडासारखा झाला होता.

हा हा म्हणता सर्व गावात येसबाबा गेल्याची बातमी समजली. सारा गाव गोळा झाला. मयतीची तयारी झाली. तिरडी बांधली व त्यावर येसबाबाला ठेवण्यात आले. कडक वाळलेल्या येसबाबाचे पाय दाबले की येसबाबा तिरडीवर उठून बसायचा. डोके दाबले की त्याचे पाय वर व्हायचे. पुन्हा पाय दाबले की परत येसबाबा उठून बसायचा. या दु:खद प्रसंगातही येसबाबाच्या कृतीचा अर्थ लोकांच्या ध्यानात आला. या प्रसंगाने लोक आपले दु:ख विसरून हसत होते व म्हणत होते. '' येसबाबा नेहमी सांगायचा, मी जिवंतपणी तर लोकांना हसवीनच, पण मेल्यावरसुद्धा हसवीन.'' हे येसबाबाचे शब्द त्याने मेल्यावरसुद्धा खरे करून दाखवले होते. अशी जन्मभर हसणारी, दुसऱ्यांना हसवणारी दु:खावर विजय मिळवणारी माणसं दुर्मिळच !....

■ ■ ■

# २.

## शोधातून बोध

वनस्पतींना भावना असतात याचा शोध डॉ. जगदिशचंद्र बोस यांनी लावला. "वनस्पतींना आनंद होतो. दु:ख होते. मग रागपण येत असणार नाही का ?" असा प्रश्न मी आमचे काकांना विचारला. त्यावर काका म्हणाले, "अरे वनस्पतींना भावना आहेत. याचा अर्थ रागपण आहे. वनस्पतीत लाजरीचे एक झाड असते. त्या झाडाला स्पर्श केला तर ते आपली पाने मिटून घेते. या एकाच गोष्टीवरून ही गोष्ट सिद्ध होत नाही का ?" यानं माझं पूर्ण समाधान झालं नाही. मग झाडे सूडसुद्धा घेऊ शकतील, याची माझी खात्री झाली व मला आमच्या गावात घडलेली घटना आठवली....

आमच्या गावात संभाजी नावाचा एक अल्पभूधारक शेतकरी आपल्या छोट्याशा जमिनीवर आपली कशीबशी गुजराण करीत होता. जेमतेम वर्षभर कसे तरी पुरेल एवढे धान्य पिकवीत होता. वरच्या तेल मिठासाठी त्याला दुसऱ्याच्या शेतात मोलमजुरी करावी लागत होती. त्याला एक बबन नावाचा मुलगा होता. तो आता मोठा झाला होता. कसातरी ८ वी-९ वी पर्यंत शिकला व संभाजी थकल्यामुळे तो आपल्या बापाला प्रपंचात मदत करावी म्हणून स्वतंत्रपणे लाकडाच्या वखारीचा धंदा करू लागला होता. त्यात त्याचा जम चांगला बसला होता. आता त्याला चार पैसे मिळू लागले होते. संभाजीने बबनचे लग्न एका गरीब कुटुंबातील मुलीशी लावून दिले होते. बबनची सासरवाडी शेजारच्या गावात होती. बबनचे दोनाचे चार हात झाले. नवा प्रपंच उभा राहिला. त्यामुळे आता बबनला संभाजीचे प्रपंचासाठी व स्वत:च्या प्रपंचासाठी जास्त कष्ट पडू लागले. एवढे कष्ट करूनही संभाजी बबनच्या धंद्यावर नाराज होता. तो आता थकला होता. त्यामुळेच बबनचे कष्ट तो घेत होता. बबनचा लाकडाचा धंदा होता. रोज चार-दोन झाडांचे बळी घ्यायचे.



चांगली तरणीताठी झाडं पाडायची. झाडांचे शिव्याशाप घ्यायचे. हे संभाजीला पसंत नव्हतं. त्याचं मन आतल्या आत रडत होतं. तोसुद्धा 'हर्नाक्यूलर फायनल' म्हणजे आताची सातवी पास होता. 'वनस्पतींना भावना असतात' हा धडा शिकवताना त्याने मन लावून गुरुजींचं म्हणणं ऐकलं होतं. त्याचा संभाजीच्या मनावर इतका खोलवर परिणाम झाला होता की, त्याने त्याच्या आयुष्यात कधी झाडे तोडली नव्हती. पण मुलगा बबन मात्र हा पापी धंदा करतोय याचा सल त्याच्या मनात सारखा होता. त्यामुळे त्याला झोप येत नव्हती.

एकदा रात्री असाच तो पडला होता. त्यावेळी बबन आपल्या कुऱ्हाडींना धार लावत होता. त्याला सासरवाडीच्या डाक बंगल्यावरची मोठी लाकडाची ऑर्डर मिळाली होती. बबनने खालच्या आवाजात संभाजीला विचारलं, ''बाबा, आपल्या आंबपट्टीतली ती मोठी बाभळ

पाडू का? लई माल निघलं. आर्डर पण पुरी होईल. पैसा बी बखळ मिळंल.''

या त्याच्या बोलण्यानं संभाजी खाडकन उठला. ''नगंनगं रं माझ्या बाळा. अरं आंबपट्टीतली ती बाभळ देवाची हाय. जवान हाय. आपलं वर्षाचं जळण तिच्या काटींवर होतं, शिवाय शेताला कुपाटी पण होती. तिला पाडून झाडाचा शाप तुला लागंल. झाडांनासुद्धा मन असतं. रोज तू हे किती पाप करतोस, ठाव आहे तुला! मी तुला हात जोडतो, असा अविचार करू नगंस.'' यावर बबन मिस्कील हसला व मनात म्हणाला, 'खुळंच आहे म्हातारं....'

दुसऱ्या दिवशी चार दोन गडी, हत्यारं, दोर सर्व साहित्य घेऊन बबन शेतावर गेला. त्यानं पहिला घाव त्या झाडावर घातला. त्यातून लालसर रक्तासारखी धार लागली. त्याचे जोडीदार म्हणाले, ''काय रगाट झाड हाय. लई माल निघंल.''

घावावर घाव पडत होते व ते झाड तुटत होते. चार इंच भाग पडायचा राहिला होता. ते प्रचंड झाड आता वाऱ्याने हलायला लागलं होतं. बबन गड्याला दोर बांधा नी ओढा, अशी युक्ती सांगू लागला. झाडाला झाप मोठा. पसारा मोठा. त्यामुळे सर्वांना विचार पडला. बबन धाडसानं शेंड्यावर गेला. मोठ्या दणकट फांदीला दोर बांधले. चार दोरांची टोकं गड्यांनी व बबनने धरून ओढण्यास सुरुवात केली. काड् काड् असा चिरका आवाज झाला आणि ते प्रचंड पसारा असलेले झाड जमिनीवर कोसळू लागले. 'बबन बाजूला हो, सरक, बाजूला.' असे गडी ओरडत होते. तेव्हढ्यात ---

बबनच्या दोराला जोराचा हिसका बसला. हाताला दोराचे विळखे असल्यामुळे बबन झाडाच्या फांद्यांखाली जोरात फेकला गेला व जमीन व फांद्यांमध्ये सापडला. त्याला बाहेर पडता येईना. सहा तास प्रयत्न करूनही त्याला बाहेर काढता येईना. शिवारातील सर्व बाजूने लोक धावले. डोळ्यांदेखत बबनचा आवाज, ''मला वाचवा रे! कुणी वाचवा रे! वाचवा!!'' या किंकाळ्या ऐकू येत होत्या. पण कुणीही त्याला वाचवू शकत नव्हते. सायंकाळी ७॥ वाजता त्याचा प्राण गेला. दुसरे दिवशी त्याचा मृतदेह पांढऱ्या कापडात लपेटून त्याच्या घरी आणण्यात आला.

त्याच्या पत्नी, मुले, आई, बापाने जोराचा हंबरडा फोडला. संभाजी मोठमोठ्याने ओरडून म्हणत होता, "तरी मी सांगत होतो बाळ, रोज तू चार-पाच झाडांचे बळी घेतोस. त्यांचा शाप तुला लागेल. ते तुझा सूड घेतील. बघ, आता त्यांनी तुझा सूड घेतला.... झाडांना प्रेम लावलं असतं तर त्यांनी तुला प्रेमानं मदत केली असती. पण तुला हे सुचणार कसे?' 'विनाश काले विपरीत बुद्धी! म्हणतात ती हीच' माझ्या तोंडून सहज उद्गार बाहेर पडले.

वनस्पतींना भावना आहेत. तर मग त्यांचे ठिकाणी सुडाची भावना पण असेल, हे खोटं कसं म्हणावं? मुलांनो, झाडे वाचवा, झाडे जगवा, झाडे वाढवा. हाच सापडे बोध खरा! हेच खरं...


■ ■ ■

# ३.

# अर्धे ज्ञान नाशाचा प्राण

उत्तुंग हिमालयाच्या पायथ्याशी चीड व देवदार वृक्षांचे घनदाट सावलीत ब्रम्हपूर हे एक तीन हजार वस्तीचे गाव होते. सम्राट अशोकांचे धर्मगुरूंचे ते पूर्वी वसतीस्थान होते, असे तेथील वयस्कर लोक बोलत. याच गावात जयराम पंडित हे गृहस्थ राहत होते. गावातील ब्रम्हगिरी महाराजांच्या समाधीची पूजाअर्चा करणे, त्याची झाडलोट करणे, वार्षिक उत्सव पार पाडणे, ब्रम्हगिरी मठात केदारनाथ-ब्रदीनाथांच्या यात्रेला येणाऱ्या यात्रेकरूंची अल्प मोबदल्यात जेवणाखाण्याची, राहण्या-झोपण्याची सोय करणे हे त्यांचे रोजचे उत्पन्नाचे साधन होते. उत्सव, किर्तने, प्रवचने त्या आश्रमातील भव्य सभागृहात रोज चालत असत. येणारे साधू, संन्याशी, किर्तनकार, प्रवचनकार यांची प्रवचने नित्य असायची. योगासनाचे वर्गपण तिथे चालत. ते स्वत: जयराम पंडित घेत असत. कधी काहीच कार्यक्रम नसेल तर पंडितजींचे प्रवचन होत असे. असा रोजचा नित्यक्रम चालत असे. त्यामुळे पंडितजी व त्यांची पत्नी शारदादेवी यांचा प्रपंच फार सुखात व समाधानात चालला होता.

आज ब्रह्मगिरी महाराजांची पुण्यतिथी होती. जयराम पंडित आपल्या प्रिय पत्नीला बरोबर घेऊन समाधी मंदिराकडे निघाले. ब्रह्मपुत्रेच्या निर्मळ प्रवाहात स्नान करून हातात स्वच्छ पाण्याचा लोटा घेऊन शारदादेवींना पूजासाहित्य घेण्यास सांगून ते मठात आले. समाधीची शोडषोपचारे पूजा करून ते महाराजांचे समोर आसनावर डोळे झाकून बसले. ते इतके एकाग्र झाले, तल्लीन झाले की त्यांना काही काळ बाह्य जगाचा विसर पडला. त्यांच्या मस्तकात आवाज घुमू लागले. प्रकाश दिसू लागला व प्रकाशात गुरू महाराजांची अस्पष्ट मूर्ती दिसू लागली. गुरूजींनी जयराम पंडितांना आशीर्वाद दिला, ' तुझे पोटी एक पुत्र होईल, तो महान पंडित, सिद्धयोगी होईल व तुझे जीवनसाफल्य होईल. पण त्याबरोबर एक वाईट



घटना पण घडेल.' हे ऐकताच पंडितजींची समाधी भंग पावली. पण वाईट घटनेचे विचार मात्र त्यांना सोडीनात. काय वाईट घटना घडणार? पण तसे घडण्याची चिन्हे काहीच नव्हती; त्यामुळे कालांतराने ही गोष्ट ते विसरून गेले.

समाधी मंदिरात घडलेली घटना त्यांनी आपल्या पत्नीला सांगितली. दु:खद घटना काय? या पत्नीच्या प्रश्नाचे उत्तर मात्र त्यांनी देण्याचे टाळले. कारण ते त्यांनासुद्धा माहीत नव्हते. याचे उत्तर आपण स्वत: शोधावे हा विचार शारदादेवींचे मनात आला व त्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरू झाले. त्या एकाग्रतेने योगासन घालून समाधी अवस्था प्राप्त करण्याचा प्रयत्न करू लागल्या. पण त्यांना गुरूशिवाय ती विद्या प्राप्त होईना. आपल्या पतीदेवांकडून ही विद्या प्राप्त करून घ्यावी असा मनाशी निश्चय करून त्या आपल्या कामाला लागल्या.

आज जयराम पंडितांना घरी यायला रात्रीचे बारा वाजले होते. त्यानंतर त्यांनी हात-पाय धुवून जेवण केले व ते झोपण्याचे खोलीत गेले. त्यांच्या पाठोपाठ शारदादेवी पण आल्या. त्यांच्या शेजारी बसत

त्यांनी पंडितजींना लाडीकपणे म्हणाल्या, "अहो, आपण मला समाधी लावण्याचे शिकवाल का?"

पंडितजींना होकार दिला. त्याप्रमाणे समाधी घेण्याचे धडे पंडितजींनी देण्यास सुरुवात केली. एक महिन्यात समाधी घेण्याचे शिक्षण पूर्ण झाले. आता समाधी उतरवण्याचे शिक्षण पूर्ण व्हायचे होते. समाधी अवस्थेतील सर्व टप्पे चढायचे व तसे उतरायचे. पण समाधी अवस्थेत बराच काळ राहून परत पूर्व पदावर कसे यायचे हेच शिकवण्याचे राहिले होते, ते पुढील आठवड्यात पूर्ण होणार होते.

तो दिवस चैत्र प्रतिपदेचा होता. पंडितजी बद्रीनाथच्या यात्रेला गेले. मठाची व्यवस्था आपल्या शिष्याकडे दिली. शारदादेवींना नित्यक्रमाची सूचना देऊन ते गेले.

पंडितजी गेल्याला आज पंधरा दिवस होऊन गेले. जाऊन आलेल्या यात्रेकरूंत बद्रीनाथला झालेल्या प्रचंड हिमवादळाची चर्चा ऐकू येऊ लागली. त्यामुळे शारदादेवींना फार चिंता वाटू लागली. नाही नाही ते वाईट विचार त्यांच्या मनात येऊ लागले. गुरूदेवांनी पतिराजांना सांगितलेली हीच तर दुःखद घटना नसेल? या विचारांनी त्यांच्या काळजात धस्स झालं. त्यांचे मनावर भयंकर ताण आला.

या घटनेचा शोध घेण्यासाठी आपण समाधी अवस्थेत जावे, मनावरील ताण कमी होईल व पतीदेवाच्या खुशालीचे आकलन होईल या हेतूने त्यांनी स्नान केले. धुतवस्त्रे परिधान केली. एका व्याघ्रचर्मावर पद्मासन घालून त्या बसल्या व त्यांनी समाधी लावली. त्या समाधी अवस्थेत बराच काळ राहिल्या पण त्यांना समाधी उतरविण्याचे पूर्व-पदाला येण्याचे ज्ञात नसल्यामुळे त्यांचे पंचप्राण समाधी अवस्थेतच स्थिर झाले.

या घटनेलाही आता आठ दिवस होऊन गेले. आज शुद्धीवर येतील, मग शुद्धीवर येतील असे समजून लोकांनी त्या गतप्राण झाल्या असे समजून त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले. त्यांना जिवंत जाळले.

बद्रीनाथचे हिमवादळ आता शमले होते. पंडित जयरामपंत आता आपल्या घराच्या वाटेला, परतीचे प्रवासाला निघाले होते. येणाऱ्या यात्रेकरूंमध्ये शारदादेवींच्या मृत्यूची चर्चा होत होती. ती पंडितजींच्या

कानावर पडायची. पण आपली पत्नी धडधाकट आहे, तिच्या संबंधी ही चर्चा नसावी असे वाटत होते. आता घराजवळील जवळच्या मुक्कामात एक योग्याकडून शारदादेवींच्या समाधी अवस्थेचे वर्णन ऐकले तेव्हा मात्र पंडितजी त्या धर्मशाळेत मुक्कामाला न राहता रात्रीसुद्धा प्रवासाला निघाले व घरी आले तोवर सर्व संपले होते. शारदादेवींना त्या लोकांनी जिवंत समाधी अवस्थेत जाळले होते. समाधी अवस्थेत जाण्यापूर्वी त्यांना समाधी अवस्थेतून परत पूर्वपदावर येण्याचे शिक्षण देणे जरूरीचे होते. ही फार मोठी चूक आपल्या हातून घडली. त्याचा त्यांना पश्चात्ताप झाला व अर्धवट ज्ञान कसे घातक असते याचे प्रत्यंतर त्यांना आले. त्यांच्या डोळ्यांपुढे महाभारतातील त्या वीर अभिमन्यूची व चक्रव्यूहाची प्रतिकृती चमकू लागली.

■ ■ ■

# ४.


# निर्धन लक्षाधीश

आमच्या गावाच्या पूर्वेला गणपतीचे ओझर दोन किलोमीटरच्या अंतरावर आहे. ओझरचा विघ्नेहर म्हणून अष्टविनायकांपैकी एक आहे. त्या तीर्थक्षेत्रातील ही कथा आहे. ६० वर्षां पूर्वीची....

याच गावात एक गणपत नावाचा श्रीगजाननाचा भक्त राहत होता. रोज सकाळी उठावे, स्नान करावे. धूत ओल्या वस्त्राने श्री विघ्नहराची पूजा करावी, मगच आपल्या शेतात कामाला जावे असे सतत तीस-पस्तीस वर्षे त्याचा नित्यक्रम चालू होता.

असाच तो दिवस चतुर्थीचा होता. नित्याप्रमाणे स्नान करून गणपतीची पूजा करून तो शेतात गेला होता. शेतात आता पिके नव्हती. पण काट्याकुट्या वेचण्यासाठी तो शेतात हिंडू लागला. आता सूर्यनारायण वर वर येऊ लागला होता. पूर्वेकडे तोंड करून जेव्हा गणपत चालू लागला तेव्हा समोरच्या तेजाने त्याचे डोळे दिपले. थोडावेळ त्याला पुढचे काहीच दिसेना. तो त्या तेजोमय वस्तूजवळ गेला व त्याने ती चटकन् उचलून घेतली. बराच वेळ न्याहळून, ती एक गारगोटी आहे असं त्याला वाटले. त्याने तो दगड फेकून दिला. व तो परत आपल्या घरी आला. आज चतुर्थीचा उपवास असल्याने व मंदिरात भजनाचा कार्यक्रम असल्याने त्याने शेतातल्या त्या वस्तूचा विचारसुद्धा केला नाही.

दुसऱ्या दिवशी तो शेतावर गेला. परत तोच डोळे दिपण्याचा प्रकार झाला. आता मात्र त्याने तो दगड उचलून आपल्या खिशात घातला. शेतावरचे काम आटोपून तो घरी आला. खिशातला दगड गणपतीच्या फोटोच्या देवळीत ठेवून तो तिथेच जवळ आडवा झाला. मध्यरात्री जेव्हा त्याला जाग आली. तेव्हा त्या देवळीत लख्ख प्रकाश पडलेला त्याच्या दृष्टीस पडला. डोळे चोळत व विचार करत तो उठला. त्याने तो प्रकाशमान दगड हातात घेतला. लहानपणी कधी तरी त्याच्या वडिलांच्या तोंडून



सिंदबादच्या सफरीतील हिऱ्यासंबंधी त्याने ऐकले होते. हिरा हा अंधारात सुद्धा प्रकाश देतो, याची आठवण त्याला झाली व त्याने तो दगड एका रूमालात लपेटून घेतला.

सकाळ कधी होते नी आपण गावचे सोनाराकडे तो कधी घेऊन जातो असे त्याला झाले. प्रथम त्याने तो हिरा शामू सोनाराला दाखवला.

''आहेत का शामुकाका?'' गणपत रामराम करीत म्हणाला, ''अहो, आज एक मोठे काम घेऊन आलोय. एक दगड आणलाय. तो हिरा असावा असं वाटतंय. तो विकायचाय...''

''हिराऽऽ'' शामू सोनार जरा आश्चर्याने ओरडला, ''गणपतराव!

हिरे काय कुठेही सापडतात होय ? काय आमची टिंगल उडवताय राव !''

''अहो, बघा तर खरं हिऱ्याचा रात्री प्रकाश पडतो ना? तसा याचापण पडतो. पण मला तो विकायचा! किती पैका देता बोला.''

''बघू!'' शामूकाकाने तो दगड हातात घेतला. ''वाटतोय तर हिरा.'' ते न्याहाळीतच म्हणाले. पण त्याचा आवाज लबाड माणसासारखा वाटला. आता गणपतरावला बनवून हा हिरा हस्तगत करावा असा विचार त्यांच्या डोक्यात आला.

पहिल्यांदा हा दगड फार मोलाचा आहे, हे म्हणणारा शामूकाका आता त्या दगडाची हेटाळणी करू लागला. हे गणपतरावाच्या लक्षात आले.

''मग शामुकाका घेताय का हा दगड ? बोला किती पैका देता ?''

''हे पहा गणपतराव, हा हिरा आहे म्हणता, पण तो हलक्या दर्जाचा असणार. मी त्याचे दोनशे रुपये देतो. तुम्हाला सौदा पटला तर पाहा. या उलट तुमचा दगड तुम्ही परत न्या.''

''ठिक, यापेक्षा जास्त देणार नाही ? अहो, देवाच्या वाड्यातले ते बबुदेव म्हणत होते. हा अस्सल हिरा आहे. त्याचं मोल लाखात असतं. अन् तुम्ही तर याचे दोनशेच म्हणता. पण का हो शामूकाका फडतूस दगडाचे तुम्ही दोनशे तरी कसे काय देता हो ?''

''बघा बुवा गणपतराव, पटलं तर द्या. यावर आपली मर्जी. ते वकिली बोलणं आपल्याला पटत नाही. व्यवहार कसा रोखठोक असावा.'' शामूकाका म्हणाले नी पान थुंकण्यासाठी उठले.

गणपतरावांनी तो दगड परत बांधून खिशात घातला. व ते पायात वहाणा घालण्यासाठी दरवाज्यात गेले.

''हे पाहा- गणपतराव, शेवटचं मागतो पाचशे घ्या. पण गावात कुणाजवळ काही बोलू नका.''

''नाय जमायचं.'' म्हणत गणपतराव रस्त्याला लागले. त्याच्या डोक्यात त्या दगडाचाच विचार होता. बबुदेव तर म्हणाले एक लाखाचा हिरा असतो तोसुद्धा हरभऱ्याच्या डाळी एवढा. यात काही तरी गूढ आहे. आपण तालुक्याच्या सराफाला दाखवू.

गणपतराव दुसरे दिवशी तालुक्याला गेले. तेथील सराफाने त्याची

किंमत पाच हजार केली व त्याची हेटाळणीपण केली. हेटाळणी करूनसुद्धा या दगडाची किंमत जर पाच हजार होते. तर यात काही तरी काळेबरे खास आहे, असा विचार करत गणपतरावांनी जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्याचा बेत केला.

पुण्याला सराफाने त्याचे पन्नास हजार केले. गणपतरावांना तेही मंजूर होईनात. हा दगड काही तरी अनमोल आहे. मुंबईला इलाक्याचे सराफाकडे जाऊ म्हणून ते मुंबईला गेले. तिथे त्याची एक लाख किंमत झाली. तरीसुद्धा गणपतरावांचे समाधान होईना.

गावात ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. मुंबईच्या सराफ बाजारात दोन तीन ठिकाणी गणपतरावांनी हा दगड दाखवला. प्रत्येक वेळी त्याची किंमत वाढतच गेली. काही नी अर्धा द्या, पाव द्या, अशासुद्धा मागण्या केल्या. सराफ बाजारात काम करणाऱ्या एका नातेवाईकाचे ओळखीने त्याची किंमत करावी म्हणून गणपतराव त्यांचे नातेवाईक रामभाऊ कवडे यांचे घरी गेले. त्यांनी तो दगड त्यांना दाखवला. त्यांनी सांगितले, ''हा हिरा पाच लाखापर्यंत विकतो. तुम्ही जरा थांबा.''

''कायऽऽ!'' गणपतराव जवळजवळ टणकन उडाले, ''अहो बोलता काय ?''

''खरं तेच सांगतो.'' रामभाऊ म्हणाले, ''या दगडात मोठाले आठ ते दहा हिरे होतील व छोटे चार-पाच निघतील. हिरकण्या तर वर बऱ्याच मिळतील. या सगळ्याची किंमत पंधरा- वीस लाखाचे घरात जाईल. त्याला पैलू पाडावे लागतील. त्याचा खर्च फार मोठा असतो.''

''हे पाहा रामभाऊ, हा हिरा तुम्ही विका. मला फक्त दोन लाख द्या. आणि दुसरे असे की साधारण सागरगोट्या एवढा एक हिरा माझ्या तर्फे विघ्नहर गजाननाच्या बेंबीत बसवण्यासाठी द्यावा. हा दगड विकताना तशी बोलीच करायची. तुम्ही पण पन्नास हजार कमीशन घ्या.''

गणपतरावांच्या ह्या श्री गजाननाच्या श्रद्धेने रामभाऊंनासुद्धा गणपतरावांना फसविण्याचे धाडस होईना. माणसाच्या त्यागातून त्याच्याकडे आणखी पैसा येतो हा साक्षात्कार रामभाऊंना झाला.

दुसरे दिवशी रामभाऊ व गणपतराव सराफ बाजारात गेले. सागरगोट्याएवढ्या आकाराचा हिरा विघ्नहर गणपतीच्या बेंबीत

समारंभपूर्वक बसविण्याचा संकल्प करून रामभाऊंना पन्नास हजार देऊन तीन लाख रुपये गणपतरावांना देण्याचे कबूल करून दोघेही आपल्या घरी परत आले. तीन लाखाचा चेक व तो अष्टपैलू हिरा घेऊन रामभाऊ, गणपतरावांकडे ओझरला आले व समारंभपूर्वक तो हिरा विघ्नहर गणपतीचे बेंबीत बसवला गेला. तो आजतागायत बेंबीत आहे.

गणपतराव निर्धन होते. पण लक्षाधीशपण होते. त्यांच्या उदार त्यागातून व चिकित्सक वृत्तीतून ते खरोखर लक्षाधीश झाले. ही जीवनातील एक गुरुकिल्लीच आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

■ ■ ■

# ५.

## जिद्दी मुलगा

कुकडी-पुष्पावतीचे संगमाजवळ हिवरे हे एक पुरातन खेडे होते कुकडी धरणाचे पाण्याखाली हे खेडे काळाचे पडद्याआड गेले. पण नव्या जोमाने दुसऱ्या ठिकाणी ते वसवले गेले. त्या खेड्यातील एका जिद्दी मुलाची ही कथा आहे.

याच गावात श्री. गणपतराव मराठे या नावाचे धार्मिक प्रवृत्तीचे साधे सरळ गृहस्थ राहत होते. पाचसहा माणसांचे ते कुटुंब आपल्या छोट्याशा जमिनीवर कसेबसे जगत होते. अधूनमधून मुले मुंबईला कामधंद्याला जात व वर्षाची तोंड मिळवणी करीत होते. याच घरात सुदाम मराठेचा जन्म झाला. हिवरे येथील शाळेत त्याचे सातवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले. शिक्षणात बऱ्यापैकी असलेला हा मुलगा मात्र जिद्दी होता.

एक दिवस सुदाम शाळेच्या कंपौंडच्या भिंतीवर बसला होता. चार दोन मुले नी एक म्हातारापण त्याचे शेजारी आपली गुरे राखीत बसला होता. एक कावळा उडत आला नी सुदामच्या डोक्यावर त्याने आपली विष्ठा टाकली. दोन इरसाल शिव्या हासडून सुदामने डोके नदीवर जाऊन धुतले. पण त्याचे मित्र मात्र त्याला कावळा हाग्या म्हणून चिडवू लागले. सुदाम चिडायचा. संतापायचा. पण मनापासून अभ्यास करायचा. त्याबरोबर बसलेल्या म्हाताऱ्याने मुलांना सांगितले की हा मुलगा कुणीतरी मोठा पंडित होईल. ही अंधश्रद्धा होती. पण सुदामने ती श्रद्धा मनात जोपासली. आपण कुणीतरी महान पंडित व्हावं ही ईर्षा त्याच्या मनात घर करून बसली. सातवी पास होऊन सुदाम आळंदी-पंढरपूर-काशी असा संस्कृत ग्रंथांचा अभ्यास करत करत त्याने वेदाचार्य ही संस्कृत पदवी संपादन केली. पुढे पुढे सुदाम देशमुख हे किर्तन प्रवचन करू लागले. त्यांचा संस्कृत ग्रंथांचा अभ्यास फार सखोल होता हे लोकांनाही



आता जाणवू लागले होते. किर्तन कौमुदी, गीता, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव व वेदाध्यायन यामध्येही त्यांनी आपली जिद्द पणाला लावली. आज एका ऋषीकेश येथील विद्यालयात संस्कृतचे प्राध्यापक म्हणून त्यांचा नावलौकीक फार मोठा आहे. आपले पिताश्री गणपतराव मराठे यांच्या दशक्रियेला गावी आले असताना माझी त्यांची भेट मोटर स्टँडवर झाली. एका खेड्यातील, गरीब कुटुंबातील हा उनाड मुलगा आज एक महान पंडित झाला याचा मलाही अभिमान वाटला. त्याच्या बालपणी हा मुलगा या योग्यतेला पोहचेल असे स्वप्नातसुद्धा वाटले नाही. पण त्याची जिद्द त्याला या पदाला घेऊन गेली.

"आपण सुदाम मराठे ना?" समोरून येणाऱ्या शुभ्र वस्त्रधारी उंच धिप्पाड तरुणाला मी विचारले. त्याने माझ्याकडे थोडावेळ बघितले. "आपण शाळीग्राम ना?" असा प्रतिप्रश्न करत त्याने त्या रस्त्यातच मला लवून नमस्कार केला.

'तुझे कसे काय चाललंय?' असा प्रश्न विचारण्यापूर्वीच त्याने मला सांगण्यास सुरुवात केली. "मी सध्या ऋषीकेशला एका कॉलेजमध्ये संस्कृतचा प्राध्यापक आहे. माझी पत्नी त्याच कॉलेजात प्राध्यापक आहे. सध्या माझे उत्तम चालले आहे. बाबांच्या दशक्रियेला आलो होतो. काल

येथे किर्तनाचा कार्यक्रम झाला. उद्या परत कामावर जाणार आहे. मी हिवरे सोडले, संस्कृत विशारद झालो. एम. ए. संस्कृत केले. वेदाचार्य ही काशी विद्यापीठाची पदवी पण घेतली. आता ज्ञानदानाचे काम करत आहे. काही संस्कृत पाठ्यपुस्तकेपण लिहिली आहेत. आपण कधी ऋषीकेशला आलात तर माझ्या घरी या. तिथे मला पंडितजी म्हणून ओळखतात. पंडित सुदाम मराठे या नावाने कोणालाही विचारा ते तुम्हाला माझे घरी आणून पोहचवतील.''

एके काळी उनाड असलेला हा गावरान मुलगा एक वेदाचार्य पंडित होईल हे स्वप्नातसुद्धा वाटले नाही. एव्हढा मोठा माणूस माझ्या समोर नम्र झालेला पाहून माझ्या मी पणाचे सर्व संदर्भ आपोआप गळून गेले व मला माझ्या पोकळ मोठेपणाचा राग आला. आपण किती शूद्र आहोत याचा साक्षात्कार झाला.

माणसाजवळ जिद्द व ज्ञानलालसा असेल तर तो कसा महान होऊ शकतो. याचे हे ज्वलंत उदाहरण! वयाच्या चौथ्या वर्षापासून खेड्यात उनाडक्या करणाऱ्या या मुलाचे जिद्दीने खेचून आणलेले ज्ञान पाहिल्यावर माझा माणसाच्या कर्तृत्वावरचा विश्वास वृद्धींगत झाला यात नवल ते काय?

■ ■ ■

६. 3000 901

# बाबुराव मूर्ख कसा ?

जुन्नरच्या पूर्वेला ९ किलोमीटर अंतरावर एका खेड्यात एक शेतकरी राहत होता. गावाचे जवळच दोन किलोमीटर अंतरावर त्याची बागायती शेती होती. अर्धी पाण्याने भरलेली विहीर होती. विहिरीवर दोन शेवग्याची झाडे, एक जांभळाचे झाड याशिवाय विहिरीला लागून एक छोटीशी आमराई होती. हापूस-पायरीची चार-दोन कलमी झाडे व काही रायवळ पण मधासारखी गोड आंब्याची झाडे होती. दरवर्षी रघुनाथआण्णाच्या आमराईतील आंब्याची झाडे शिवरात्रीला मोहराने भरून जात व मे महिन्याच्या सुट्टीत आंबे पाडाला लागत, असे सालोसाल चालले होते.

दरवर्षी रघुनाथआण्णाच्या घरी ५० ते ७५ हजार आंबा येत असे. आण्णाचे नातेवाईक दरवर्षी आंबे खाण्यासाठी आण्णाचे घरी जमा होत. घरचे धान्य, घरचे आंबे त्यामुळे नातेवाईक महिनाभर मुक्काम ठोकून असत.

या वर्षी रघुनाथआण्णाच्या आमराईत आंब्याचे भरघोस पीक आले होते. एक लाख आंबा आला. रघुनाथआण्णांच्या वाड्यातील सर्व माड्या आंब्याने भरून गेल्या. आंबा पिकत घालण्याससुद्धा जागा उरली नाही. एवढ्या फळांचे काय करणार, हा प्रश्न होता. यावर्षी काही कारणामुळे पाहुण्यांची वर्दळ पण कमी झाली होती. आंबे विकायचे नाहीत हे आण्णाचे तत्त्व होते. पण तो विचार त्यांनी या वर्षी बदलला. आपला एकुलता एक मुलगा व त्यांच्या दोन भाच्चांना पन्नास, पन्नास आंबे भरून दोन पाट्या दिल्या व त्यांचे थोरल्या मुलाला मोठ्या पाटीत शंभर आंबे भरून दिले. दोन्ही भाच्यांना दिलेले शंभर आंबे त्यांनी दोन प्रकारात निवडले. बारीक पन्नास आंबे व मोठाली पन्नास फळे वेगळी काढली. मोठ्या फळांचा दर एक रुपयाला दोनप्रमाणे लावला. जरा बारीक फळांचा दर एक रुपयाला तीनप्रमाणे लावला.



आता त्यांच्या थोरल्या मुलाची शंभर फळे सरसकट दोन रुपयाला पाचप्रमाणे विकण्यास सांगितली. वरील तीनही मुलांना रघुनाथआण्णांनी शेजारच्या बाजाला पाठवले.

रघुनाथआण्णाच्या भाच्यांच्या आंब्यांचे पहिल्याचे, बाळ्याचे पंचवीस रुपये झाले पन्नास आंब्यांच्या टोपलीचे.

राजाचे पन्नास आंब्यांचे एक रुपयाला तीनप्रमाणे सोळा रुपये झाले व दोन आंबे शिल्लक राहिले. ते बाळ, राजा या त्यांच्या भाच्यांनी येताना खाऊन टाकले.

रघुनाथ आण्णांच्या थोरल्या मुलाने, बाबुने दोन रुपयाला पाचप्रमाणे चाळीस रुपये केले. सर्व आंबे खपवून आण्णाचे भाचे व मुलगा परत गावी यायला निघाले. आपआपले हिशेब ते एकमेकांना सांगू लागले. आणि काय ? त्या मुलांना आश्चर्यचा धक्काच बसला.

विक्रीचा दर सारखा असताना बाळचे पन्नास आंब्याचे रुपयाला दोनप्रमाणे पंचवीस झाले होते.

राज्याचे पन्नास आंब्याचे रुपयाला तीनप्रमाणे सोळा झाले व दोन आंबे शिल्लक राहिले होते व रघुनाथअण्णाच्या बाबुचे, दोन रुपयाला पाचप्रमाणे चाळीस रुपये झाले होते.

बाळ-राजाचा दर एक रुपयाला दोन व एक रुपयाला तीन ' बारीक फळ ' याप्रमाणे दोन रुपयाला पाचच होत होता.

बाबुचा दर दोन रुपयाला पाचच सरसकट होता. तरी बाबुचे चाळीसच रुपये झाले व बाळ-राजांचे एक्केचाळीस रुपये झाले. याशिवाय त्यांनी दोन आंबे पण प्रत्येकाने एक एक खाल्ला.

आपल्या भाच्यांनी एक्केचाळीस रुपये शंभर आंब्याचे केले व दोन आंबे दोघांनी खाल्ले तरीही एक रुपया जास्त मिळाला याचे कोडे कुणालाच सुटेना.

बाबुरावला काही धंद्याची अक्कल नाही. तो मूर्ख आहे असे म्हणत ते बाबुरावर रागावले. पण त्या बिचाऱ्याला आपण मूर्ख कसे हे मात्र अद्याप समजलं नाही.

पुढच्या बाजाराला त्यांनी आपल्या भाच्यांना शंभर शंभर आंबे घेऊन पाठवले. ते निवडून बारीक, मोठे वेगळे करून बाळचे एक रुपयाला दोन व राजाचे एक रुपयाला तीन याप्रमाणे व बाबुरावचे दोनशे दोन रुपयाला पाचप्रमाणे. या वेळीसुद्धा बाळचे पन्नास, राजाचे तेहतीस व एक आंबा शिल्लकच राहिला व बाबुरावांचे फक्त ऐंशीच रुपये झाले. या वेळी तीन रुपये जास्त कसे झाले ? बाळ-राजाला मात्र एकच आंबा खाता आला. या वेळीपण बाबुराव मूर्ख ठरला होता. पण तो कसा मूर्ख आहे हे मात्र कुणीही सांगू शकले नाही.

प्रथम पन्नास आंबे विकायला दिले व नंतर शंभर प्रत्येकी दिले ते आंबे दुप्पट झाले. पण नफा मात्र तिप्पट झाला. पहिल्या वेळी एक रुपया जास्त मिळाला. यावेळी तीन रुपये जास्त मिळाले हे कसे काय झाले याचे कोडे पण कुणाला सुटेना.

याचे उत्तर गणिती भाषेत आहे असं आमच्या गुरुजींनी सांगितले. बाळचा दर एक आंबा पन्नास पैशाला व राजा तेहतीस पैशाला म्हणजे दोन आंबे त्र्याऐंशी पैशाला विकले गेले. व बाबुरावाचे दोन आंबे ऐंशी पैशाला विकले गेले याचा अर्थ त्या तिघांचे दरात तीन पैशाचा फरक आहे. बाबुरावांनी आंबे स्वस्तात विकले व राजांनी तीन पैशाने आंबे महाग विकले हे जेव्हा गुरुजींना विचारून रघुनाथअण्णाना सांगितले. तेव्हा त्यांनी बाबुरावावर रागावणे सोडून दिले.

मुलांनो, तुम्हीपण तुमच्या मित्रांना हे कोडे सांगा व त्याचे खरे उत्तर शोधा. तुमच्या विचारांना चालना देणारे ते खासच आहे. यातून मोठ्या व्यवहार चातुर्याचा उगम होणार आहे. हे पण लक्षात ठेवा. हेही नसे थोडके..

■ ■ ■

# ७.

# यशाची गुरुकिल्ली

गणपतराव एक मोठा यशस्वी व्यापारी झाला. माधवरावांचा धंदा मात्र बसला. दोघांनीही एकाच वेळी धंद्याला सुरुवात केली. दोघांचेही भांडवल सारखे होते. दोघेही धंद्यात वाकबगार होते. दरवर्षी दोघेही आपल्या भांडवला एव्हढा नफा कमवत होते. त्यात दोघांचे प्रयत्न सारखे होते. श्रम सारखे होते. पण गणपतरावांचा धंदा जोर धरून चालला होता व माधवरावांचा धंदा बसत चालला होता.

गणपतराव व माधवराव जरी एकच धंदा करीत असले तरी पण त्यांचे संबंध मैत्रीचे होते. धंद्यासंबंधी चर्चा करण्यासाठी ते रात्रीचे एकत्र बसत. गप्पा, गोष्टी, चर्चा करत. एकमेकांचे धंद्यासंबंधी विचारपूस करत...

आज सुट्टीचा दिवस होता. गणपतराव व माधवराव मंदिराचे कट्ट्यावर गप्पा करीत बसले होते. मंदिराच्या दर्शनाला अनेक भाविक भक्त येत होते. त्यामध्ये एक साधू महाराजपण होते. देवाचे दर्शन घेऊन ते गणपतराव व माधवरावांचे जवळ कट्ट्यावर येऊन बसले. आता तिघांच्या गप्पा सुरू झाल्या. त्या साधूने त्यांना धंद्याचे एक गणित सांगितले. त्याची कथा अशी होती-

सदू-मधू हे दोन व्यापारी होते. दोघांचाही व्यापार सारखाच होता. दोघांचे जवळ बंदा रुपया भांडवल होते. हे दोघे दरवर्षी एक रुपयाचे दोन रुपये करीत. एक रुपया खर्च करीत व पुढील वर्षासाठी एक रुपया शिल्लक ठेवीत. हे जोपर्यंत चालले होते, तोपर्यंत त्यांचा धंदा स्थिर होता. पण सदुने एक दिवस असा विचार केला की जर आपण एक रुपयाला एक रुपया कमवतो व एक रुपया खर्च करतो. त्याऐवजी ९९ पैसे खर्च केले तर आपला धंदा वाढेल. त्याने या वर्षी ९९ पैसे खर्च केला. एक रुपयाचे दोन केले खर्च ९९ वजा जाता सदुजवळ एक रुपया एक पैसा राहिला. तो त्याने दुप्पट केला दोन रुपये दोन पैसे झाले त्यातून ९९



पैसे खर्च केला. एक रुपया तीन पैसे झाले. त्याचे दुप्पट केले दोन रुपये सहा पैसे झाले. त्यातून ९९ पैसे खर्च केला; आता एक रुपया सात पैसे उरले. त्याची पुन्हा दुप्पट या प्रमाणे सदुचा धंदा भरभराटीत चालू लागला. दर वर्षी त्याचे भांडवल वाढत गेले. व तो यशस्वी व्यापारी झाला.

इकडे मधूशेठने एक रुपयाचे दोन केले पण खर्च एक रुपया न करता एक रुपया एक पैसा केला. त्याचे जवळ ९९ पैसे शिल्लक राहिले. त्याचे त्याने दुप्पट केले. ते एक रुपया ९८ पैसे झाले. त्यातून त्याने एक रुपया खर्च केला. उरले ९८ पैशाचे दुप्पट केले ते एक रुपया ९६ पैसे झाले. त्यातील एक रुपया खर्च केला. खाली ९६ पैसेच राहिले. खर्च पूर्वी इतका ठेवूनही आता त्याचा धंदा डबघाईला येऊ लागला होता. याचे कारण काय तर धंद्यासाठी करावयाच्या खर्चाची मर्यादा त्याने ओलांडली होती. सदुने मात्र खर्चावर मर्यादा घातली, नव्हे मर्यादेपेक्षा खर्च कमी केला. त्यामुळे त्याच्या भांडवलात सतत वाढ होत गेली. या उलट मधूचे भांडवलात घट होत गेली व त्याचा धंदा बसत चालला.

कष्ट, श्रम, भांडवल सर्व सुविधा दोघांच्याही सारख्या असून सदू एक यशस्वी व्यापारी ठरतो. व मधू दिवाळखोर व्यापारी ठरतो. या यशापयशाचे गमक तुम्हीच शोधा मी येतो. आता बराच वेळ गप्पा मारल्या, असे म्हणून साधू महाराज निघून गेले. पण माधवराव- गणपतरावांच्या डोक्याच्या शिरा तट्ट फुगल्या. ते साधू महाराजांच्या कथेचा विचार करू लागले. व त्या कथेतून त्यांना आपल्या धंद्याच्या यशाची गुरुकिल्ली सापडली होती. ती अशी--

वार्षिक व्यापारापेक्षा खर्चाचे प्रमाण नेहमी कमी असावे. ते जर जास्त असेल तर धंदा अयशस्वी होतो. ते प्रमाण म्हणजे वर्षात एकूण केलेल्या व्यापाराचे निम्यापेक्षा कमी असावे. हे जर निम्मे असेल तर धंदा आहे, तसाच स्थिर चालतो व जर जास्त असेल तर बसत चालतो व कमी असेल तर यशस्वी होतो, भरभराटीला येतो. या साधू महाराजांचे कथेने गणपतराव व माधवरावांना चांगला धडा शिकवला होता. तेव्हापासून त्या दोघांचाही व्यापार वृद्धींगत होत गेला व ते बाजारपेठेतील यशस्वी व्यापारी ठरले.

मुलांनो, तुम्ही मोठे झाल्यावर व्यापारधंद्यात पडणार असाल तर हे यशाचे गमक तुम्हाला खचीतच उपयोगी पडेल व तुम्ही एक यशस्वी उद्योजक व्हाल.

■ ■ ■

# ८.


## चतुराई

सरदार महाडकरांच्या वाड्यात आज चहुकडे वर्दळ चालू होती. आज त्यांच्या मुलीचा साखरपुडा होणार होता. विवाहाची बैठक होणार होती. फार पूर्वी हुंडा पद्धत नव्हती. दोन्ही खानदानातील लोक एखादी अडचणीत टाकणारी अट घालून वधू-वराकडील मंडळींनी ते कोडं सोडवायचं, अशा पद्धतीने बुद्धीच्या कसोटीच्या उतरल्यावर हा विवाह सोहळा मोठ्या प्रेमाने, सहकार्याने पार पडत असे.

सरदार चिपळूणकरांचा मुलगा मुलगी बघण्यासाठी येणार होता. सरदार महाडकरांच्या वाड्यावर आज गावातील प्रतिष्ठित सावकार-इनामदार येणार होते. त्यांच्या स्वागताची तयारी जोरात चालू होती. दोन्ही घराणी नामवंत होती. सरदार चिपळूणकर आपल्या सरदारी लवाजम्यात व राजेशाही पोशाखात आले. महाडकरांच्या मंडळींनी त्यांचे शाही थाटाने स्वागत केले.

महाडकरांची मुलगी चिपळूणकरांना पसंत पडलीच होती. आज बैठक, मानपान, कुणाकुणाला द्यायचा, लग्न कोठे करायचे, वऱ्हाडी मंडळी किती येणार यासारख्या किरकोळ पण महत्त्वाच्या बाबींवर विचार होणार होता. पण महाडकरांची मुलगी सून म्हणून आपल्या घरात येणार आहे. स्वयंवरासारखी एखादी जबरदस्त अट घालावी व मुलीच्या चातुर्याची परीक्षा घ्यावी, म्हणून चिपळूणकरांचे मुलाने महाडकरांच्या मुलीला म्हटलं, "हे पाहा आम्हाला, हुंडा-वरदक्षिणा वगैरे काही नको. पण आमची एक अट आहे, की आमच्या वाड्यात एक आड आहे. तो मुलीकडच्या लोकांनी साजूक तुपाने भरून द्यावा. ह्या अटीवर लग्न होईल."

ह्या नवऱ्यामुलाच्या विक्षिप्त अटीने दोन्ही बाजूकडील मंडळी आश्चर्यचकित झाली. आता हे लग्न मोडते की काय? यामुळे संपूर्ण दिवाणखाना शांत झाला. बराच वेळ कुणीच काही बोलना. नवरी मुलगी



पोक्त व वयस्कर बायकांच्या घोळक्यात जाऊन बसली व आपआपसात हळू आवाजात चर्चा सुरू झाली. यात साधारणत: अर्धातास गेला. मग काहीतरी सुचल्यासारखे करून नवऱ्यामुलीने चुटकी वाजवली व सर्वांसमोर उभे राहून तिने, ही अट कबूल आहे, लग्नाच्या आदले दिवशी आपला आड साजूक तूपाने भरला जाईल असे सांगितले. बैठकीला जमलेली सर्व मंडळी आऽवासून पाहू लागली.

आता लग्नाचा मुहूर्त ठरवणेच राहिले होते. तोपण कुलोपाध्यायाचे सल्याने काढण्यात आला. वैशाख शु. द्वादशीचा मुहूर्त ठरला. सर्व मंडळी उठली व आपआपल्या मार्गाला लागली. पण सर्वजणांच्या तोंडी एकच चर्चा होती. हे कसे घडणार? महाडकरांच्या मुलीचे लग्न काही पार पडत नाही. हा हा म्हणता ही बातमी सर्व महाराष्ट्रात पसरली. प्रत्येक जण कसं काय होणार? असे प्रश्न विचारत होता.

लग्नाचे अगोदर एक दिवस मुलीने चिपळूणकरांचे मुलाला एक खलीता एका नोकराबरोबर धाडला. 'आम्ही आपल्या अटीप्रमाणे तुपाचे हांडे जे जमेल तसे घेऊन येत आहोत. आपण आपला आड उद्या

सकाळपर्यंत संपूर्ण कोरडा करून ठेवावा. आम्ही दिलेल्या तुपात पाणी मिसळले जाऊ नये.'

पत्र मिळताच चिपळूणकरांनी उलट टपाली निरोप धाडला. ' सरदार महाडकर, आपली सुपुत्री आमचे घरात सून म्हणून येत आहे. हे आमचे भाग्य आहे.'

भरपूर पाणी असलेला आड कोरडा करणे शक्य नव्हते. जसे आड तुपाने भरून देणे शक्य नव्हते. मुलीच्या चातुर्यावर मात्र दोन्हीकडची मंडळी अत्यंत खूश झाली होती. तरीसुद्धा अटीप्रमाणे चिपळूणकरांना देण्यासाठी सर्व वऱ्हाडाने एक एक लोटी साजूक तूप आणले होते. ते तूप जवळच रायगडावरील तुपाचे विहिरीत टाकण्यात आले होते. या रापलेल्या तुपाने सैनिकांच्या जखमा बऱ्या होत. त्या काळी हेच जखमा भरून काढण्याचे औषध होते. ही बातमी जेव्हा रायगडावर महाराजांना समजली. तेव्हा सरदार महाडकरांच्या मुलीच्या बुद्धीचातुर्याचे महाराजांनी कौतुक केले व त्यांना चार गावे इनाम दिली. असा हा महाडकर व चिपळूणकर लग्नसोहळा मोठ्या थाटाने व आनंदाने पार पडला हे सांगणे नकोच !

■ ■ ■

# १.

## रोखीचा व्यवहार

कोल्हापूरपासून वीस किलोमीटरवर एका खेड्यात राघू-सदू नावाचे दोन गवळी राहत होते. दिवसभर शेतात कष्ट करायचे. सकाळी तालमीत घुमायचे, व्यायाम करायचा. जत्रेच्या वेळी गावोगाव कुस्त्यांचे फड जिंकायचे असे त्यांचे आयुष्य चालले होते. कधीमधी दूध घेऊन कोल्हापूरला विकण्यासाठी घेऊन यायचे.

तो दिवस एकादशीचा होता. हे दोन्ही गवळी आपल्या घरी शिल्लक राहिलेले पाच पाच लिटर दूध कोल्हापूरला विकण्यासाठी निघाले. त्यावेळी आताच्यासारखी एस्. टी.ची सोय नव्हती. गाव डोंगराळ भागात असल्याने घोडा किंवा सायकल हीच वाहने चालत होती. त्याप्रमाणे त्यांनी आपल्या सायकली घेतल्या. सकाळी आठ वाजता ते घरांतून निघाले. घरातून निघताना त्यांच्या बायकांनी त्यांना कोल्हापूरहून तरकारी आणण्यास सांगितले. दूध उधारीने विकू नका. रोख विका. तीन रुपये लिटरप्रमाणे पंधरा रुपये होतील. त्यात पाच रुपयाची तरकारी, दहा रुपयात तेल, मिरची, साखर आणा. हॉटेलात पैसा खर्च करू नका. अशा अनेक सूचना केल्या. पैशाचा हिशोब बरोबर जमला पाहिजे. बरं बरं म्हणत ते दुधाचे कॅन घेऊन वाटेला लागले होते. सर्व व्यवहार रोखीने करायचा हे आपल्या पत्नीचे वाक्य त्यांच्या कानांत सारखे घुमत होते.

आपल्या गावापासून पाच किलोमीटर आले असतील नसतील तोच त्यांच्या सायकली पंक्चर झाल्या. रस्ता डोंगराळ, काट्याकुट्यांचा! त्यामुळे ते रडतखडत पायी चालत निघाले. वाटेतल्या प्रवासाचे श्रमाने त्यांच्या पोटात कावळे कोकायला लागले. पण खायला काहीच नव्हते. राघूने आपल्या पेहरणीचे खिसे चापले. त्याच्या खिशात एक रुपयाचे एक नाणे सापडले. तेव्हा राघू सदुला म्हणाला, "सदू, मला तर बुवा भूक लागलीय. असं कर, मला एक रुपयाचे दूध दे रोख." राघूने सदुला



एक रुपया दिला. व एक रुपयाचे दूध घेतले व भुकेच्या सपाट्यात त्याने ते दूध एका दमात संपवले. त्याला सदुचीपण आठवण झाली नाही. थोडे चालून गेल्यावर सदुला दूध प्यावेसे वाटले. त्याने राघूकडून आलेला रुपया त्याला दिला व रोखीने एक रुपयाचे दूध घेतले.

थोडे अंतर गेल्यावर राघुने परत तोच एक रुपया सदूला दिला व रोखीने परत एक रुपयाचे दूध घेतले असे करत करत ते दोघे कोल्हापूरजवळ आले. त्या वेळी त्यांचे कॅन पूर्ण रिकामे झाले होते. आपण दूध रोखीने विकले आहे, दूध संपले म्हणून ते परत गावाकडे निघाले.

घरी त्यांच्या बायका त्यांची वाटच पाहत होत्या. आल्या आल्या त्यांनी विचारले, ''काय विकले का दूध ? किती पैसे आले ? सामान आणलेत का ? रोख विक्री केली ना ?''

बराच वेळ कुणीही काही बोलले नाही. ''आम्ही सर्व व्यवहार रोखीने केला.'' सदू म्हणाला. ''मग पैसे किती झाले ?'' बायकोने विचारले. '' तेव्हा सदुने आपल्या खिशातला एक रुपया काढून बायकोपुढे ठेवला व ते दोघे अपराध्यासारखे त्या रुपयाकडे पाहत होते. पण तरी

त्यांनी सर्व दुधाची विक्री रोखीनेच केली होती. तरी पण असे कसे झाले हेच त्यांना समजेना. त्यांनी घडलेली सर्व हकीकत आपल्या बायकांना सांगितली. तेव्हा त्यांनापण आश्चर्य वाटले. सर्व दूध रोखीने विकले गेले. तरीसुद्धा एकच रुपया विक्रीचा आला.

तात्पर्य असे होते की या व्यवहारात विक्री रोख झाली ती फक्त एक रुपयाची. बाकीचे सर्व दुधाचा त्यांनी स्वतःच उपभोग घेतला. जर तुम्ही दुकानदार व्यापारी झालात तर दुकानातील भांडवलातून आणलेल्या मालाचा वापर स्वतःच्या घरात केल्यास तो व्यापार वा दुकान बंद पडल्याशिवाय राहणार नाही. मुलांनो, समजलं का यातील रहस्य - ?

■ ■ ■

# १०.

## कारण अभ्यास तुका म्हणे...

एका खेड्यात एक पहिलवान राहात होता. जुन्या खानदानी घराण्यातील पहिलवान. दिवसभर रिकामटेकड्यासारखे फिरणे किंवा लोकांची टिंगलटवाळी करणे, याशिवाय काहीही काम करत नव्हता. तरी याचे पोट भरायचे साधन काय आहे व तो आपले पोट कसे भरतो याचे कोडे बरेच दिवस गावातील लोकांना उलगडत नव्हते. असे असूनही त्याला लोक मदत करत. कारण त्याने गावातील एका धनाढ्य पण गावाच्या उपकारकर्त्याचे संपूर्ण कुटुंब वाचवले होते. त्याची हकीगत गावकरी आलेल्या पाहुण्यांना नेहमी सांगत असत.

शामूकाका पहिलवानाचा नित्यक्रम पहाटे न उठता उशिरा उठणे, घरच्या म्हशीच्या दुधाची चरवी सकाळी नऊ वाजता घटाघटा पिणे, बारा ते एक देवपूजा करणे, दुपारी एक-दोनला जेवण करणे, दुपारी तालमीत घुमणे, व्यायाम करणे, सायंकाळी नदीवर फिरणे अशा प्रकारे नित्यक्रम चालू होता. यात शिस्त नव्हती. वागण्याचा विक्षिप्तपणा होता. त्याच्या म्हशीला एक पाडी झाली. आता शामुकाकाला रोजचे काम वाढले होते. रोज सकाळी म्हशीला व पाडीला नदीवर चांगले धुऊन आणणे हे एक काम वाढले होते. असाच एक दिवस म्हशीला घेऊन शामुकाका नदीवर चालला होता. रामरावांच्या जुन्या वाड्याची चांधई अचानक कोसळली. चांधई लगतची तुळई कोसळली व आता संपूर्ण वाडा कोसळण्याची चिन्हे दिसू लागली होती. इतक्यात घरातून लोकांच्या आरडाओरडण्याचे आवाज येऊ लागले. शामूकाका धावतच घराच्या खिंडारातून घुसला व त्याने ती खांबाचा आधार मोडलेली, कोसळणारी तुळई आपल्या खांद्यावर उशी घेऊन तोलून धरली. घरातील मंडळींना बाहेर काढले. व सुताराने खांबाचा आधार देईपर्यंत तुळई तोलून धरली. रामरावांचे कुटुंब शामुकाकाच्यामुळे वाचले होते म्हणूनच बक्षीस म्हणून

ही म्हैस शामुकाकांना मिळाली होती. आता तिला पाडी झाली होती रोज शामुकाका खांद्यावर मेंढरासारखी उचलून नदीवर नेत असे व परत घरात आणत असे. अशी दोन-तीन वर्षे गेली. आता ती म्हैस होण्याच्या स्थितीत आली होती. तरीही ती पाडी शामुकाका रोज उचलून नेत असे. लोकांना पण त्याच्या या ताकदीच्या प्रयोगाचे आश्चर्य वाटायचे. आता ती म्हैस झाली, तरी तोच क्रम चालू होता. पंचक्रोशीत शामुकाकांचा बोलबाला झाला होता. त्याच्या अचाट ताकदीची लोक वाहवा करीत होते.

शामुकाकाने एक म्हैस विकून टाकली, पाडी सांभाळली होती. पाडीसुद्धा आता मोठी म्हैस झाली होती, व्याली होती. शामुकाका म्हशीला रोज खुंट्याला दिवसभर बांधून ठेवतो, काही खायला देत नाही, तरीसुद्धा ती चांगली धिप्पाड टंच दिसते, याचे कोडे गावकऱ्यांना बरेच दिवस सुटत नव्हते. पण रोज कुणी तरी शेतकरी, माझा घास चारला, कडवळ चारला, वाल चारला अशा प्रकारच्या तक्रारी गावात सांगत असे. जनावराचा माग काढण्याचेही प्रयत्न झाले. पण जनावर मालामध्ये फिरलेला माग सापडायचा, पण जनावर शेतात आल्याच्या किंवा गेल्याच्या खुणा सापडत नव्हत्या.

एक दिवस गावातील हुशार माणसाला शामुकाकाचा संशय येऊ लागला होता. गावातील जनावरे खायला असूनसुद्धा खराब झालेली असत. शामुकाकांची म्हैस सतत खुंट्याला बांधलेली असूनसुद्धा इतकी तयार कशी ? याचा शोध घेण्याचा गावातील काही तरुणांनी चंग बांधला व ते आता शामुकाकाचे पाळतीवर राहू लागले. एका हुशार मुलाला शामुकाकावर दिवसभर नजर ठेवायला नेमण्यात आले. पण शामुकाका सापडला नाही. एक दिवस शामुकाका पूजेला बसलेत असे पाहून त्या तरुणांनी शामुकाकाच्या म्हशीचे पेडं सोडले. ती मोकळी म्हैस आदल्या रात्री ज्या शेतकऱ्याचे शेतातील घासात विलायती गवत चरायला गेली होती. तिथेच ती परत गेली. आता मात्र गावातील पोरांची खात्री झाली की गावातील शेतकऱ्यांच्या घासात, ऊसात, वालवडात, पिकात शामुकाकाची म्हैस रात्री चरत असली पाहिजे. म्हणूनच ती दिवसभर बांधलेली, काहीही खायला नसताना तगडी आहे. पण आता शामुकाकांना

विचारायचे कसे ?

मनाचा हिय्या करून पूजा आटोपल्यावर त्या तरुणांचे गटाने शामुकाकाचे घरी ओसरीवर ठाण मांडले. '' शामुकाका तुमची म्हैस कुठे ? ती सदुअण्णांच्या विलायती गवतात चरतेय.''

'' ऑऽऽ '' शामुकाका तटकन उठले. '' कशी काय सुटली बुवा ? तिला भवानीला घरी खायला काय कमी आहे. पण जनावरच ते त्याला काय अक्कल असणार ! '' असे म्हणत लोकांना बसायला सांगून काका धावतच शैतात गेले. त्यांनी म्हैरा हाकत घरी. आणली. आता म्हशीचे पावलाचे माग जाताना, येताना व घासातपण दिसत होते. पण आजपर्यंत शेतात माग दिसत, पण आत जाताना किंवा बाहेर येतानाचे माग दिसत नव्हते. याचं लोकांना आश्चर्य वाटत होते व हा काही तरी जादुटोणा असावा, भुताटकीचा प्रकार तर नाही ना याची शंका पण येत होती. व ती शंका शामुकाकांच्या ओसरीवर बसलेल्या शंकरने शामुकाकांना विचारली. त्याबरोबर शामुकाका हसले. '' मला तुम्ही माफ करणार असाल तर सांगतो. मी रोज माझ्या म्हशीला खांद्यावर घेऊन शेतातील पिकात रात्री बारा एकचे सुमारास सोडतो. तिथेच जवळ कुठेतरी झोपतो. रात्री तीन वाजता म्हशीला मेंढरासारखे खांद्यावर घेऊन उचलून घरी आणतो.'' या वाक्याने सर्वजण आऽवासून शामुकाकाकडे बघत राहिले. शामुकाकांच्या ताकदीचे कौतुक करू लागले.

दुसरे दिवशी शामुकाका म्हैस उचलतात, याची हकीगत साऱ्या पंचक्रोशीत वाऱ्यासारखी पसरली. गावातील लोकांनी शामुकाकांना म्हैस उचलून शेतात नेणे व परत आणण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवण्याची विनंती केली. त्याप्रमाणे शामुकाकांनी हा ताकदीचा प्रयोग सर्वांचे समक्ष करून दाखवला. लोकांनी शामुकाकांना मोठे रोख बक्षीस दिले. त्यांच्या म्हशीच्या खाण्याचा पण प्रश्न सोडवला.

ही बातमी श्रीमंत पेशव्यांचे कानावर गेली. त्यांनी त्यांच्या ताकदीचे प्रयोग पाहून त्यांना चार एकर जमीन इनाम दिली. आता शामुकाका एक चांगले शेतकरी झाले होते. पण त्यांच्या म्हैस उचलण्याचे रहस्य काय, हे जेव्हा लोकांनी शामुकाकांना विचारले, तेव्हा शामुकाका म्हणत, '' कारण अभ्यास तुका म्हणे मी या पाडीला जन्मापासून खांद्यावर फिरवित

होतो. रोज रोज उचलून तिला पण आपले वजन चारण्याचा, कमी करण्याची सवय होत गेली व आजही हजार - दिड हजार किलोची म्हैस मी सहज खांद्यावर घेतोय.'' सर्व तरुण आश्चर्याने आऽ वासून शामुकाकांच्या तोंडाकडे पाहात राहिले.

■ ■ ■


# ११.

## ग्रामराज्यातील खरा राजा

तो काळ इंग्रजांच्या अन्यायी राजवटीतील काळ होता. एका खेडेगावातील, सर्जेवाडीतील ही घटना. सर्जेवाडीचे पाटील सर्जेराव जाधव हे गावचे भूषण होते. गावाच्या सुधारणांसाठी त्यांचा अहोरात्र विचार चालू असे. गावाजवळून वाहणाऱ्या नदीला श्रमदानाने छोटासा कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधून सर्जेवाडीच्या शिवारांतील शेत जमिनीला सर्जेराव पाटलांच्या नेतृत्वाने पाणी मिळू लागले होते. त्यावर आठमाही बागाईती पिके घेऊ लागले होते. सरकार दरबारी उपेक्षीत असलेली सर्जेवाडी आपल्या स्वत:च्या सामर्थ्याने नी सर्जेरावांच्या कुशल नेतृत्वाने दिवसेंदिवस प्रगती पथावर चालली होती.

१९३६ साली अचानक दुष्काळ पडला होता. त्या दुष्काळातून सर्जेवाडी गाव, तालुका, जिल्हा पोळून, होरपळून निघाला होता. दुष्काळाचे पुढचे वर्षी मायबाप सरकारचा हुकूम निघाला, सर्व शेतकऱ्यांनी एकरी एक पोतं धान्य लेव्ही म्हणून घालावे. नोटीसा सुटल्या. गावागावात काटे-मापे चावडीवर लागली व सरकारी अधिकारी बळजबरीने वसूली करू लागले. आदले वर्षीचे दुष्काळाने कर्जबाजारी झालेले गावकरी आता या सरकारी संकटाने भयंकर हवालदिल झाले होते.

एक दिवस वसूली अधिकारी सर्जेवाडीच्या चावडीत अचानक दत्त म्हणून उभा राहिला. चावडी समोरच्या पटांगणात ताडपत्र्या अंथरल्या गेल्या. चार-पाच शिपाई, गावचा कोतवाल पोत्याची चार-पाच बंडले, सुतळी, दाभण सर्व साहित्य चावडी समोर पडले होते. त्यात जुन्या पद्धतीची डमरूचे आकाराची आधेलीची चार-पाच मापे पडलेली होती. प्रथम गावचे कोतवालाने गावात दवंडी दिली, '' लेव्ही वसूलीसाठी गावात अधिकारी आलेले आहेत. त्यासंबंधी चावडीवर बैठक घेण्यात येत आहे. तरी गावकऱ्यांनी चावडीवर ताबडतोब जमावे होऽऽऽ ''



कोतवालाची दवंडी ऐकून सर्व ग्रामस्थ चावडीवर भराभरा गोळा झाले. सर्जेराव पाटील हे आपली घोळदार पेहरण, करवती काठी धोतर, डोक्यावर भलेमोठे पागोटे, खांद्यावर रेशमी उपरणे, हातात वाकडी आकडीची काठी, पायात जोडा-जो चलताना कर्र कर्र असा आवाज करायचा, अशा थाटात चावडीवर आले. सर्व ग्रामस्थ जमले होते. लांब एका कोपऱ्यात सर्जेराव पाटील बसले. काही ग्रामस्थांनी त्यांना पुढे येण्यासाठी जागा करून दिली. पण ते हात दाखवून व डोळा मारून, मी मागेच बरा असे खुणेने सांगत होते. व त्यामुळे लोकांनी आग्रह करण्याचा सोडला होता. मिटींग चालू झाली. साहेबांनी सर्वांना एकरी एक पोतं धान्य द्यावे असे बजावले. आपण स्वखुशीने आणून द्यावे. या उपर घरोघर जाऊन, झडती घेऊन धान्य वसूली केली जाईल, असा प्रसंग आणू नये.

"साहेब, आम्हा गावकऱ्यांना अन्यायकारक प्रसंग यावा असे मनापासून वाटत नाही. पण मागील वर्षाचे दुष्काळाने आम्ही कर्जबाजारी झालो आहोत. चालू साल पण पर्जन्य कमी झाला. पीक पण घटलं आहे. जेमतेम पाच-सहा महिने पुरंल एवढंच धान्य ग.जात प्रत्येकाला झालंय. तेव्हा आता लेव्ही सरकारला देणं शेतकऱ्यांना औंदा शक्य होणार

नाही. पुढच्या साली न बोलता घालू. एव्हढी मेहरबानी करा.'' असे अनेकांनी विनवले. पण साहेब ऐकायलाच तयार होईना. ''तुम्ही शेतकरी मोठे लबाड आहात. धान्य आलं तरी पिकलंच नाही. पाऊस पडला तरी तो वेळेवर पडला नाही. आभाळ आलं तर धान्यावर किड पडली. भरघोस धान्य आलं तर ते पाखरांनीच खाल्लं लाख सबबी दरवर्षी सांगता नी लेव्ही घालण्याचे टाळता. तेव्हा यंदा सरकारने लेव्ही सक्तीची केली आहे. मी धान्य वसूली केल्याशिवाय येथून जाणार नाही. लवकर काय ते ठरवा.'' असे सांगितले.

अनेक कारणे-तीसुद्धा खरी असताना साहेब ऐकायला तयार नाही, हे पाहून सर्जेराव पाटलांची कानशीलं गरम झाली. त्यांना राग आला. ते कोपऱ्यातून उठले. नी मोठ्या आवाजात म्हणाले, ''साहेब, मागल्या वर्षीसारखा औंदा बी दुष्काळ आहे. तेव्हा यावर्षी लेव्ही खुषीची ठेवा, ही, आमची विनंती आहे. सत्ता तुमच्या हातात आहे. तेव्हा तुम्ही काहीही करू शकतो. पण त्याबरोबर हेही लक्षात ठेवा की, 'शेतकरी जगला तर देश जगला व तुमचे सरकार पण जगलं.' यापेक्षा जास्त बोलणं म्हणजे स्वत: दगडावर डोके आपटून घेण्यासारखं आहे.'' या बोलण्याने साहेबाचा पारा रागाने लालेलाल झाला. त्याला पाटलांचे ते शब्द वर्मी लागले.

''कोण, रे हा म्हातारा? याला कोणी मध्येच वकिली करायला सांगितली? येव्हढं त्याला गावकऱ्यांची, गरिबांची कळकळ आहे. तर त्याला म्हणावे तू स्वत: सर्व गावाची लेव्ही भर...''

''साहेब'' कोतवाल खालच्या आवाजात म्हणाला, ''ते गावचे पाटील. सर्जेराव पाटील. तुमचे मोठे साहेबसुद्धा त्यांना मुजरा करतात.''

''ऑऽ ऑऽ'' साहेब दचकले. त्यांचा रागाचा पारा जरा खाली आला. ''पाटील इकडे या पुढं.'' साहेबांनी त्यांना जवळ बोलावले. कोतवालाला खुर्ची आणायला सांगितली. सर्जेराव पाटील खुर्चीत बसले नी म्हणाले, ''साहेब, माझ्या गावच्या लोकांवर अत्याचार झालेला मला मुळीच आवडणार नाही. जर तुम्ही घरात शिरून गरिबाची भांडी बाहेर काढाल तर गावकरी तुम्हाला गावाच्याबाहेर काढतील. मग त्याचे काहीही परिणाम होवोत. तुम्ही कितीही मोठे साहेब असा, लोक त्याची पर्वा

करणार नाहीत.''

''पाटील '' साहेब गरजले. ''लोकांना भडकवण्याचे काम करू नका. आता लोक कबूल झाले होते. तुम्ही त्यात अडथळा आणताय.''

''साहेब, तुम्ही धान्य नेल्यावर उपाशी मरण्यापेक्षा तुरूंगात दोन वेळेला तुकडा तरी मिळेल. या भावनेने ते तुमचा प्रतिकार करतील. आता मी जशी विनंती करतो तशी तुम्हाला मला विनंती करावी लागेल, की पाटील लोकांना आवरा, समजवा. पण उपाशी माणूस देवालासुद्धा मानत नाही. तिथं तुमचं- आमचं काय घेऊन बसलात.''

''पाटील, नुसतं पोपटासारखं बोलून माझं काम होणार नाही. मी हुकूमाचा ताबेदार आहे. अन् गावचा तुम्हाला कळवळा असेल तर तुम्ही भरा सर्व गावाची लेव्ही. अन् जाऊ द्या मला कचेरीला परत! वाद मिटला.''

''पण एक अट आहे. तुमचा एक कोतवाल सकाळी ६ वाजल्यापासून ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत जेव्हढे माप होईल तेव्हढी लेव्ही तुम्ही सर्व गावची म्हणून माझ्या एकट्याकडून घेऊन जायची.''

साहेबाला सर्जेराव पाटलांचे आश्चर्य वाटले. हा कसला एव्हढी लेव्ही देतोय? नुसती बडबड; असे समजून साहेबांनी ही अट कबूल केली.

दुसरे दिवशी सकाळी ६ वाजता कोतवाल मापाला लागला ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत. मध्ये जेवणापुरता थांबला होता. दुसऱ्या कोणीही मापाला हात लावायचा नाही, असे ठरल्यामुळे तेव्हढाच वेळ माप बंद होते. जवळ ५ ते ५॥ खंडी भाताची लेव्ही एकट्या सर्जेराव पाटलांनी सर्जेवाडीसाठी सरकारात भरली होती. आणि सरकारला आश्चर्याचा धक्का दिला. साहेबांनी पोती गाडीत भरली नी ते न बोलता कचेरीला गेले.

दरवर्षी सर्जेराव पाटलाच्या सल्ल्याशिवाय सर्जेवाडीत लेव्ही वसूली होत नव्हती. आता तर सर्जेराव पाटील हे सर्जेवाडीचे अनभिषिक्त सम्राट झाले होते, ते त्यांच्या बोलण्याने नव्हे तर त्यांच्या प्रत्यक्ष कार्याने. गांधीजींचे ग्रामराज्यातील हाच खरा राजा! जो जनतेवर होणारा अन्याय दूर करतो.


■ ■ ■

# १२.

## मूकप्रेम

भाऊसाहेब एका संस्थानचे दिवाण होते. राजाचे खाजगी कारभारी असल्याने त्यांचा मानमरातब मोठा होता. सकाळी ८ वाजता ते राजवाड्यात जात. जाताना त्यांना नेण्यासाठी घोड्याचा टांगा येत असे. राजवाड्यातील देवडीवरच्या भालदार-चोपदारांचे मुजरे स्वीकारत ते राजवाड्यात प्रवेश करीत.

स्वातंत्र्यानंतर संस्थानिकांचे संस्थानांना ग्रहण लागले. सरदार वल्लभभाई पटेलांनी संस्थाने खालसा केली. श्रीमंत राजेसाहेबांचे तनखे बंद केले गेले व त्यांचे उत्पन्नाचे साधन बंद झाले. सत्ता खिळखिळी झाली. राजेसाहेबांनी अर्थात नोकर कपात् केली. संस्थाने विलीन झाली. राजांनी आपला राजवाडा सोडला व ते पुणे-मुंबई सारख्या शहरात बंगले घेऊन राहू लागले. संस्थानिकांचा दररोजचा खर्च अफाट. त्यामुळे राजांचा खजिना हळूहळू कधी रिकामा झाला ते त्यांनासुद्धा कळले नाही. राजेसाहेबांनी अश्वशाळेतील आपले अश्व भराभर मिळेल त्या किंमतीला विकून टाकले जे सोने- नाणे वाचले होते ते घेऊन राजेसाहेबांनी आपले राजवाडे सरकारच्या ताब्यात दिले. आता फक्त राजाचे दोन हत्ती विकायचे राहिले होते. एक राम व दुसरी लक्ष्मी. हे ते दोन हत्ती होते त्यातील एक राम तरुण होता व लक्ष्मी ही म्हातारी हत्तीण होती. या लक्ष्मी हत्तीला भाऊसाहेबांचा फार लळा होता. ती त्यांच्या हातूनच जेवण घेत होती. भाऊसाहेबपण तिला रोज रोट खायला घालत. एक दोन-दिवस जरी भाऊसाहेब तिला दिसले नाहीत, तरी ती कावरीबावरी होत होती. खुद्द राजेसाहेबांची पण ती फार लाडकी होती. राजेसाहेब, भाऊसाहेब जर तिला भेटायला आले तर ती आपली सोंड उंचावून, मोठा आवाज करत सलाम करत होती. आपल्या सोंडेने त्यांना कुरवाळत होती. आज पंचवीस वर्षे ती हाच कित्ता गिरवत होती. अशी ही लाडकी हत्तीण



राजेसाहेबांनापण सोडवत नव्हती. पण शहरात तिला नेणे शक्य नव्हते. त्यामुळे लक्ष्मीला भाऊसाहेबांचे ताब्यात द्यावे व आपण आपली सुटका करावी असा विचार करुन राजेसाहेब भाऊसाहेबांना सद्‌गदीत दबक्या आवाजात म्हणाले '' भाऊ, मी आजपर्यंत एका मोठ्या राज्याचा स्वामी होतो पण आज मी एक सामान्य माणूस आहे. मी तुम्हाला हात जोडून विनंती करतो की लक्ष्मीला तुम्ही पदरात घ्या. तुमच्याशिवाय ती जगूच शकणार नाही.'' हे शब्द ऐकताच भाऊसाहेबांच्या डोळयांतून अश्रूधारा वाहू लागल्या. ''महाराज, मी एक गरीब माणूस, जोपर्यंत आपल्या आश्रयाला होतो तोपर्यंत मला कसलीच चिंता नव्हती. पण आता उत्पन्नाचे साधन गेले. कुटुंबाचे ओझे वाहण्यासाठी मी असमर्थ आहे. तिथे हा पांढरा हत्ती मला कसा पोसता येणार?'' थोडावेळ कुणीच काही बोलेना....राजेसाहेब म्हणाले,'' पण त्याला दुसरा मार्ग नाही. तिचे शेवटचे दिवस तुमच्या घरीच सुखाचे जातील. तेव्हा एवढी कृपा करा.'' भाऊसाहेब सद्‌गदीत कंठाने म्हणाले, ''ठीक आहे! आपण मला सरकारकडून तिचे रेशनकार्ड काढून द्या. मी तिला शेवटपर्यंत अंतर देणार नाही.'' नंतर भाऊसाहेबांनी लक्ष्मीला घरी आणले. एका छोटया बोळातून घराच्या मागील परसात नेले व तिथे तिची बांधण्याची सोय केली.

या गोष्टीला आता सात आठ वर्षे झाली. तिच्या खाण्याने भाऊसाहेब मेटाकूटीस आले होते. पण पितृतुल्य प्रेमाने ते सारं सहन करीत होते. एक दिवस असा उजाडला की भाऊसाहेब राजेसाहेबांचे दप्तरचे ऑडीटसाठी पुण्याला आले. त्यांना कामासाठी सात-आठ दिवस राहावे लागले. आता हे त्यांच्या आयुष्यातील शेवटचेच काम होते. यापुढे त्यांचा संबंध राजकामाशी येणार नव्हता. या काळात लक्ष्मीला भाऊसाहेब दिसेनात. ती कावरीबावरी झाली. तिला कोणी आंघोळ पण घालेना. तिने अन्न वर्ज्य केले. तिची तब्येत खालावू लागली. तिच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या. पशुवैद्यांना भाऊंच्या मुलांनी आणले. पण त्याचा आता उपयोग नव्हता. लक्ष्मी आता मृत्यूपंथाला लागली होती. किंचाळू लागली होती. भाऊसाहेबांसाठीच जणू काही तिने प्राण धरून ठेवला होता. भाऊसाहेबांना आणण्यात आले. त्यांना पाहताच तिने आपल्या सोंडेने त्यांच्या हाताला विळखा घातला. त्यांनी तिला पाणी पाजले. रोटीचा तुकडा चारला. तो अर्धवट तसाच राहिला. भाऊसाहेबांनी तिला कुरवाळले, तिला कुंकू लावले नी पाणी पाजण्यासाठी बादली आणण्यास गेले तेवढ्यात धुमधडाड असा आवाज झाला नी ते प्रचंड धूड खाली कोसळले. भाऊसाहेबांनी लक्ष्मी पडल्याचे पाहिले नी ते तिच्या अंगावर आक्रोश करत कोसळले. ते बेशुद्ध झाले. डॉक्टरांना बोलावण्यात आले. त्यांना शुद्धीवर आणण्यात आले. पण पाच-सहा टन वजनाचे हे धूड बोळातून बाहेर काढावे कसे ? हा मोठा प्रश्न पडला. लक्ष्मीचे तुकडे करण्याचा सल्ला जमलेल्या लोकांतील एकाने दिला. हे शब्द भाऊंच्या कानावर पडताच ते मोठ्याने ओरडत आले. ''नाही...नाही...हे कदापि शक्य नाही. तुम्ही जर लक्ष्मीचे तुकडे कराल तर मी डोके फोडून प्राण देईन!'' यावर सर्वजण स्तब्ध झाले. परसातील आवारात आता स्मशान शांतता पसरली होती व प्रत्येकजण हत्तीला बाहेर कसे न्यायचे याचा विचार करू लागले. वासे, दोर, पहारी आणण्यात आल्या. मागील आवाराची भिंत पाडण्याचे ठरले. भिंत पाडली पण हत्ती लक्ष्मीचे ते धूड आधिकच जड झाले होते. शेवटी संस्थानातून दहा- बारा हातगाड्या आणण्यात आल्या. त्या एकमेकांना बांबू पाईपाचे सहाय्याने बांधण्यात आल्या. त्याचा १० बाय १२ चा प्लॅटफॉर्म तयार करण्यात आला. त्यावर

ते धूड दोरांच्या सहाय्याने ओढून चढवण्यात आले. आवाराची भिंत पाडण्यात आली व त्या बाजूने उताराचा फायदा घेऊन १००/१२५ लोकांनी तो गाडा ओढत नदीपर्यंत नेला. नदीवर १० बाय १२ चा ६ फूट खोल खड्डा तयार करुन ठेवण्यात आला होता. त्यात ते धूड ढकलले गेले. व भाऊसाहेबांना बोलावून धरून आणण्यात आले. आक्रोश करतच त्यांनी लक्ष्मीच्या अंगावर माती लोटली. व ते हळू पावलांनी घराकडे परतले. सात-आठ वर्षे भाऊसाहेबांनी प्रपंचाची ओढाताण करून लक्ष्मीचे आपल्या मुलीसारखे पालन केले होते. तिच्या विरहाचे दु:ख ते बरेच दिवस विसरू शकत नव्हते.

लक्ष्मीला मृत्यूनंतरही तिचे तुकडे करु नका म्हणणारे, तिचे दफन इतमामाने करणारे, पशूवर सुद्धा स्वत:च्या अपत्यासारखे प्रेम करणारे भाऊसाहेब हे व्यक्तिमत्व महान नी धन्य होते. 'पशू जर मानवावर एवढे प्रेम करतात तर मानवाने का करू नये?'

# १३.

## लंकेत सोन्याच्या विटा

लंकेत सोन्याच्या विटा आहेत हे धनेगावाच्या एका न्हाव्याला समजले. धनेगावात गेली चाळीस वर्षे तो लोकांच्या दाढी-हजामती करून कसेबसे पोट भरीत होता. वर्षाकाठी चार पैसे गाठीला बांधले जात होते. पण तो स्वत: आपल्या तुटपुंज्या उत्पन्नावर समाधानी नव्हता. लंकेत जावे नी सोन्याच्या विटांची कमाई करावी ह्याची स्वप्ने तो रंगवत होता. पाचशे रुपये तोळा या भावाने चार-पाच किलोची एक वीट जर आपण कमाई करून मिळवली तरी आपण लक्षाधीश होऊ याचा विचार त्याच्या मनात चमकून गेला व तो लंकेला जाण्याच्या तयारीला लागला. तीस-चाळीस वर्षात जी काही पूंजी त्याने साठविली होती ती बरोबर घेऊन परदेशी जाण्याचा परवाना घेऊन तो लंकेला जाण्यास निघाला.

सोमवारचा दिवस पाहून तो लंकेच्या बोटीचे तिकीट घेऊन लंकेच्या प्रवासाला निघाला. सायंकाळी लंकेला पोहोचला. आपल्या बरोबर जेवणाचा डबा घेण्यास तो विसरला नव्हता. लंकेतील एका मंदिरातील धर्मशाळेत त्याने मुक्काम केला. रात्री आणलेला डबा खाल्ला. आता दुसरे दिवसापासून धंद्याला सुरूवात करायची. सकाळीच प्रातर्विधी उरकून त्याने आपली गादी एका रस्त्याचे कडेला टाकली. एक म्हातारे गिऱ्हाईक दाढी करण्यासाठी आले. त्याची दाढी अगदी घोटून, मन लावून हळूवारपणे केली. त्या गिऱ्हाईकाने त्याला दोन सोन्याच्या विटा दिल्या. तो न्हावी फार आनंदीत झाला. आपला देश किती भिकार आहे, याचा तो विचार करू लागला. आज आपण दिवसभर जर टिचून बसलो तर आयुष्याची कमाई करू असा विचार करत करत त्याने संबंध दिवसभर जवळजवळ अठ्ठेचाळीस विटा कमावल्या.

दिवसभर उपाशी पोटी राहून काम केल्यामुळे तो पार थकून गेला होता. भारतातून त्याच्या पत्नीने सर्व शीधासामग्री शामुन्हाव्याचे बरोबर



दिली होती. पण दिवसभराच्या श्रमाने तो फार थकला होता. त्यात तो उपाशीपोटी होता. आता स्वत: हाताने स्वयंपाक करीत बसण्यापेक्षा आपण एखाद्या चांगल्याश्या खानावळीत जाऊन जेवून यावे म्हणून तो उठला. रस्त्याने जाणाऱ्या एका पोक्त गृहस्थाला विचारले, 'चांगली खानावळ कुठे आहे?' त्या पलीकडे ती उंच इमारत दाखवत त्या लंकावासीयाने हा कुणीतरी परदेशी पाहुणा आहे त्याला चांगली भारी खानावळ दाखवायला पाहिजे. नाहीतर तो आपल्या देशाची त्यांच्या देशात बदनामी करील असा साधा सरळ विचार करुनच त्याने पंचतारांकीत, शीतल हवेशीर, उच्च वर्गीय लोकांची खानावळ दाखवली.

शामुन्हाव्याने जेवणाची ऑर्डर दिली. राईसप्लेटवर आपले भागणार नाही, आज दिवसभर आपण जेवण केले नाही तेव्हा यथेच्छ पोटभर जेवण घ्यायचे असे ठरवून त्याने पोटभर जेवण केले. जेवण झाल्यावर तो हॉटेलच्या काऊंटर जवळ आला. वेटरने त्याच्या टेबलावर ठेवलेल्या

बिलाकडे त्याने पाहिले. त्यावर पन्नासचा इंग्रजी आकडाच फक्त त्याला ओळखू आला. त्याने समोरच्या वेटरला हाताने खूण केली. व बिलाबद्दल मोडक्या तोडक्या हिंदीत विचारले, ''साब बिल कितना हुआ है!'' वेटरने त्याला मोडक्या तोडक्या हिंदीत उत्तर दिले, ''पचास पीस ऑफ गोल्ड है!'' हे शब्द त्याचे कानावर पडले नी तो बराच वेळ तसाच बसून राहिला. त्याला काही सुचेना. त्याच्याजवळ संबंध दिवसभराच्या कमाईच्या अठ्ठेचाळीस विटा होत्या आणि त्याचे नुसत्या जेवणाचे, तेही एका वेळेच्या पन्नास विटा बिल झाले होते. थोडा धीर करून तो काऊंटरजवळ गेला व घाबरत घाबरत म्हणाला, ''साहेब, मेरे पास अभी आडतालीस पीस है! दो पीस मै दस बजे तक दे दुंगा, मुझे मालूम नही था, मै यहाँ लंकामे नया आया हुँ!'' हे ऐकून रागावलेल्या मालकाने त्याला ''मै दसबजे तक नही ठहर सकता मुझे अभी के अभी पूरा बिल चाहीये! तुम कोई पहचानवाला लेके आओ!' शामुन्हावी गयावया करत म्हणाला, ''मेरा तो यहाँ कोई नही है! मै भारतसे आया हुं। राजीव गांधी हमारे पंतप्रधान है।'' ''अच्छा तो ठिक है, तो तुम ऐसा करो हमारी कटींग करके जावो।'' शामूने झटकन हजामतीचे सामान काढले व त्याने मालकाची हजामत अगदी घोटून केली.

आपले सामान धोपटीत भरत त्याने परत भारतात परतण्याचा निर्णय घेतला. पण जाण्यायेण्याचे खर्चाचेसुद्धा आता त्याचेकडे पैसे नव्हते. सबंध दिवसभर उपाशी पोटी काम करून त्याने भारतात येण्याच्या वाटखर्चापुरती कमाई केली व तो परत बोटीने भारतात आला.

शामू भारतात आला. घरच्या लोकांना फार आनंद झाला. आपल्या नवऱ्याने खूप कमाई केली असेल म्हणून बायकामुले त्यांनी काय काय चीजवस्तू आणल्यात याची विचारपूस करू लागली. तेव्हा मात्र शामूने डोक्यावर हात मारून घेतला. 'झालेली सर्व हकीगत सांगतो. पण मला प्रथम जेवायला वाढ, मी उपाशी आहे.' दिवसाला लाख रुपये कमवणारा आपला नवरा उपाशी आहे. हे कळल्यावर मात्र त्याच्या पत्नी-मुलांना आश्चर्याचा धक्का बसला.

परदेशात कितीही सुखसमृद्धीचा छमछमाट असला तरी शेवटी आपला देशच आपला खरा रक्षणकर्ता आहे, हे समजायला आता शामुला वेळ लागला नाही.

■ ■ ■

# १४.

## लक्ष्मीची पूजा

एका खेड्यात गावापासून एक किलोमीटरवर एक महालक्ष्मीचे मंदीर होते. त्याच गावात एक म्हातारी राहात होती. ती रोज महालक्ष्मीचे पूजेसाठी काठी टेकत टेकत जायची व परत रात्र व्हायच्या आत घरी परतायची. तिला एकुलती एक मुलगी होती. ती पण तिचे बरोबर लक्ष्मीचे देवळात दर आठवड्याचे मंगळवारी व पौर्णिमेला जात होती. दरवेळी लक्ष्मीकडे, ''माझ्या घरी लक्ष्मी भरपूर असावी. सर्व सुखी असावेत'' हे मागणं वारंवार मागत होती. पण म्हातारी मात्र 'हे महालक्ष्मी माते, तुझी कृपा असू दे' एवढंच मागत होती. म्हातारी आज जवळजवळ वीस वर्षे रोज न चुकता लक्ष्मीचे दर्शनाला येत होती. तिची ही निस्वार्थी सेवा पाहून एक दिवस महालक्ष्मी प्रसन्न झाली.

तो दिवस दिवाळीच्या अमावस्येचा होता. सकाळी उठून म्हातारीने पूजेचे साहित्य घेतले व लक्ष्मीमंदिरात गेली. आपल्या थरथरत्या हाताने लक्ष्मीदेवीची पूजा केली. मनोभावे नमस्कार केला नी काहीही न मागता घरी जाण्यास निघणार तोच मंदिराचा दरवाजा बंद झाला. कुणीतरी चेष्टा केली असेल म्हणून, म्हातारी ''कोण रे तो! दार बंद करतो'' असे म्हणून ओरडू लागली. मंदिरात आता अंधार झाला होता नी थोड्या वेळातच मंदिरात लख्ख प्रकाश पडला. साक्षात् महालक्ष्मी म्हातारी समोर उभी राहून विचारत होती. 'आज मी तुमचे नि:स्वार्थी भक्तीवर प्रसन्न झाले आहे. जेवढी धनसंपदा म्हणजेच लक्ष्मी पाहिजे ती माग. मी लक्ष्मीदेवता असल्याने मी दुसरे काही देऊ शकणार नाही.'

हे लक्ष्मीचे बोलणे ऐकून ती धूर्त म्हातारी शांतपणे म्हणाली, ''मला उतारवयात काही नको. माझ्या मुलीवर तू प्रसन्न हो व तिचे घरी तू वास करून राहा. मी उद्या माझ्या मुलीला घेऊन तुझ्या पूजेसाठी येईन.'' बोलल्याप्रमाणे म्हातारी व तिची मुलगी पाडव्याचे दिवशी पूजासाहित्य



घेऊन मंदिरात आली. लक्ष्मीची मनोभावे पूजा केली. कालप्रमाणे दरवाजा बंद झाला. ती लक्ष्मी प्रकट झाली. दोघी मायलेकीने लक्ष्मीची मनोभावे पूजा केली. पूजा संपताच लक्ष्मीदेवी बोलू लागली की, 'तुम्हा दोघींवर मी प्रसन्न आहे.' तेव्हढयात उतावळेपणे म्हातारीची लेक म्हणाली, "हे माते, तू माझ्या घरी सदैव असावेस ही माझी प्रार्थना आहे."

"पण माझ्या काही अटी आहेत त्या तुला प्रथम मान्य कराव्या लागतील." लक्ष्मीदेवी म्हणाली.

"त्या कोणत्या ? पण कोणत्या का असेनात, तू माझे घरी वास करावास. मला सर्व काही मान्य आहे. तुझ्या अटीप्रमाणे वागलो नाही तर तू माझे घरातून निघून जावेस."

"तू फार शहाणी नी हुशार आहेस. तुझ्यावर मी प्रसन्न आहे. तू माझ्या अटी पाळल्या नाहीस तर मी परत जाईन पण तेसुद्धा तुला सांगून जाईन. त्यामुळे तुला दुसरी अट मोडताना विचार करता येईल जेव्हा सर्व अटी मोडशील तेव्हा मात्र मी क्षणभरसुद्धा राहणार नाही."

"कबूल." म्हातारीची लेक झटकन म्हणाली.

"ऐक तर माझ्या अटी." लक्ष्मीने अटी सांगण्यास सुरूवात केली.

"अट नं. १. लक्ष्मी घरात येताना तुम्ही माझे स्वागत प्रसन्न चित्ताने सर्वांनी एका दिलाने करावे. घरातील कुणीही दु:खी असेल तर मी येणार नाही.

अट नं. २. तुझे घरात स्वच्छता व टापटीप असावी. सर्वजण आपापले उद्योगात मग्न असावेत. विद्यार्थी अभ्यासात असावेत.

अट नं. ३. मला घरात सन्मानाने वागवले जावे. उगाच माझी उधळपट्टी होता कामा नये.

अट नं. ४. दुसऱ्याला पिडा देण्यासाठी माझा उपयोग करू नये.

अट नं. ५. नवरा-नवरीचा सौदा करण्यासाठी माझा उपयोग होता कामा नये. असे झाल्यास मी लगेच परत जाईन.

अट नं. ६. ऐश्वर्याचा पोकळ बडेजाव दाखवण्यासाठी माझा उपयोग होता कामा नये.

अट नं. ७. माझी तुमच्या कुटुंबात रोज पूजा व्हावयास पाहिजे, पण ती प्रयत्नांची फुले, घामाचे पाणी, गाईचे दूध, प्रेमाची सुगंधी अगरबत्तीचा प्रेमसुगंध सुटलेला असावा.

अट नं. ८. घरात थोरामोठ्याचा सन्मान असावा. थोरांचा आदर होत नसेल तर कालान्तराने माझा पण होणार नाही.

अट नं. ९. मला कुलूपबंद तिजोरीत कैदेत राहावे लागू नये. माझा उपयोग समाजकार्यासाठी सुद्धा व्हावा. त्यात मला आनंद वाटेल. योग्य ठिकाणी माझे दान व्हावे.

अट नं. १०. माझेद्वारा समाजातील लोकांची फसवणूक लुबाडणूक होता कामा नये.

अट नं. ११. आपल्या घरातील कुठल्याही माणसाने समाजातील कुठल्याही एखाद्या जरी घटकाचा रक्तदान करून जीव वाचवला असेल

तर मी त्या घराचा सहसा त्याग करणार नाही

अट नं. १२. घरात मादक व्यसनाचे आहारी जाऊन माझी जर कुणी रस्त्यावरून धिंड काढणार असेल, जुगारात मला पणाला लावणार असाल तर मी तुमचे घरी क्षणभरसुद्धा थांबणार नाही.

वरील माझ्या अटी जर तुम्हाला मान्य असतील तर विचार करुन तुम्ही होकार द्या. माझ्या पूर्ण अटीप्रमाणे जर तुम्ही वागलात तर मी पिढयान्‌पिढ्या तुमचे घरी वास्तव्याला राहील. मला कष्टाचा नैवेद्य लागतो तो तुम्ही द्यालच. बरं मग मी जाऊ?''

''नको.'' म्हातारी व तिची लेक सुशिला जोरात म्हणाल्या. ''आज दिवाळीचा पाडवा आहे. काल तुझी आमचे घरी पूजापण झालेली आहे. ती पाहण्यासाठी व पाडव्याचे मुहूर्तावर देवी तुझे आगमन व्हावे ही आमची इच्छा आहे. तुझ्या सर्व अटी मला मान्य आहेत. तेव्हा तू आमचे घरी राहावेस. जर कधी तुला फिरावयास जावेस वाटले तर ते आमच्या शेतात जावेसे ही आमची एकच अट आहे.'' तेव्हापासून आश्विन अमावास्येला लक्ष्मीपूजनाची प्रथा आहे. लक्ष्मीचा उपयोग कसा होतो हे पाहण्यासाठी सरस्वतीच्या वहीची पण पूजा केली जाते. जो कोणी लक्ष्मीच्या वरील अटी मोडतो, त्याला लक्ष्मी प्रसन्न न होता त्याच्या घरातून ती निघून जाते. कशी जाते? कधी जाते? कुठे जाते? हे त्याचे त्याला पण कळत नाही. माणसाला ते आजतागायत कधीही कळलेच नाही. कारण लक्ष्मीचा शत्रू जो अहंकार, हा त्याच्या घरात लक्ष्मील त्रास देण्यासाठी बसलेला असतो. त्याला घालवून दिला तर लक्ष्मी सदैव वास करते. ही पूजा लक्ष्मीला आवडते. बरं का मुलांनो, तिला प्रसन्न ठेवण्यासाठी तिच्या वरील बारा अटी पाळाव्या लागतील, हेही लक्षात ठेवा.

■ ■ ■

3006 90118

BVBK-0403007